रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक ३२७
www.ramprahar.com

◆ सोमवार, १५ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

सारळ येथील हायप्रोफाईल सोसायटीत गांजा सेवन/२
शालेय विद्यार्थ्यांसाठी एसटीचे एनसीएमसी स्मार्ट कार्ड/५
फिलिपिन्समधील स्पर्धेत कर्जतचा अथर्व चॅम्पियन/८

## नाविन्यता भारताच्या डीएनएमध्येच -पंतप्रधान मोदी



**नीस (फ्रान्स) :** भारताच्या तरुणांची मानसिकता नाविन्यपूर्ण असून ती संपूर्ण मानवतेचा विचार करते. भारत आज केवळ संकुचित व्यावसायिक हितसंबंधांसाठी काम न करता मानवतेच्या कल्याणासाठी आणि शाश्वत भविष्यासाठी जागतिक स्तरावर नवनवीन शोध लावत आहे. नाविन्यता (इनोव्हेशन) ही भारताच्या डीएनएमध्येच आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. फ्रान्समधील नीस येथे आयोजित भारत इनोव्हेट्स या भव्य व्यासपीठाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या सोहळ्याला फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी भारताचा इनोव्हेशनचा देश असा गौरव केला आणि भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमाला फ्रान्सचा पाठिंबा जाहीर केला. दरम्यान, आगामी काळात स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्सच्या विकासासह नागरी अणुऊर्जा क्षेत्रात सहकार्य आणखी वाढवण्यावर दोन्ही देशांनी भर दिला.

# रायगडसह राज्यात आज शाळा प्रवेशोत्सव | पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे होणार भव्य स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव या कार्यक्रमाचे भव्य आयोजन सोमवारी (दि. १५) करण्यात आले आहे. जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पनवेल तालुक्यातील वहाळ राजिप शाळेत प्रवेशोत्सवासाठी सकाळी १० वाजता उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रमाला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, कोकण विभागीय आयुक्त रूबल अग्रवाल, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी



किशन जावळे, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, शिक्षणाधिकारी महारूद्र नाळे (माध्यमिक), ललिता दहितुले (प्राथमिक) आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. सुट्टीत गावी गेलेले विद्यार्थी घरी परतले आहेत. आता त्यांना शाळेत जाण्याची उत्सुकता आहे.

### ■ वहाळ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लाभणार उपस्थिती



### पाठ्यपुस्तकांचे केले जाणार वाटप

शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमांतर्गत शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या माध्यमातून नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि विकसित महाराष्ट्र २०४७च्या प्रभावी अंमलबजावणीला गती दिली जाणार आहे. शाळेत आल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळा आपली वाटावी यासाठी राजिप शिक्षण विभागाकडून 'पहिले पाऊल' ही अनोखी संकल्पना राबविण्यात येणार आहे. या संकल्पनेंतर्गत इयत्ता पहिलीमध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा कागदावर घेऊन त्याची प्रत पालकांना देण्यात येणार आहे. यामुळे शाळेचा पहिला दिवस विद्यार्थी आणि पालकांच्या कायम लक्षात राहील.

**पर्यायी इंधनाच्या दिशेने केंद्राचे महत्त्वपूर्ण पाऊल!**


# १०० टक्के इथेनॉलला मंजुरी

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

भारताने पर्यायी इंधनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून केंद्र सरकारने १०० टक्के इथेनॉल इंधनाला हिरवा कंदील दाखवला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी 'फ्लेक्स-फ्यूल' तंत्रज्ञान असलेल्या वाहनांमध्ये ई-१०० म्हणजेच १०० टक्के इथेनॉल इंधनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात आल्याची माहिती दिली.

नागपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमात बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, मला हे सांगताना आनंद होतोय की शनिवारी रात्री मी १०० टक्के इथेनॉलचा वापर करण्यास मंजुरी देणाऱ्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. कधीकाळी लोक यावर हसायचे. इथेनॉल प्रोजेक्ट रोखण्यासाठी नकारात्मक प्रचार मोहीम चालवल्या गेल्या, पण आता हे




स्वप्न सत्यात उतरताना दिसत आहे.

लवकरच आम्ही नागपुरात एक प्रायोगिक प्रकल्प सुरू करणार आहोत, ज्यामध्ये हायड्रोजन पंप आणि हायड्रोजनवर चालणाऱ्या दोन बसेसचा समावेश असेल. सामान्य जनता या हायड्रोजन बसेसमधून प्रवास करू शकेल. या बसेस 'इलेक्ट्रोलायझर'चा वापर करून पाण्यापासून मिळवलेल्या 'ग्रीन हायड्रोजन'वर चालतील. तो दिवस आता जवळ आला आहे, असेही ना. गडकरी यांनी नमूद केले.

भारताने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट नियोजित वेळेआधीच साध्य केले आहे. सरकारचा दावा आहे की यामुळे कच्च्या तेलाच्या आयातीवरील खर्च कमी झाला असून देशाची एक लाख कोटी रुपयांहून अधिक बचत झाली आहे. या यशामुळे प्रोत्साहित होऊन सरकार आता १०० टक्के इथेनॉलवर आधारित वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत आहे.

ना. गडकरी यांनी पुढे सांगितले की, पुढील दोन महिन्यांत ऑटोमोबाइल कंपन्या पूर्णपणे इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या बाजारात आणणार आहेत. टोयोटा, सुझुकी, एमजी आणि ह्युंदाई यांसारख्या कंपन्या पुढील दीड महिन्यात इथेनॉलवर आधारित वाहने बाजारात उतरवू शकतात. सरकारच्या इथेनॉल मोहिमेला गती देण्यासाठी देशभरात विशेष पेट्रोल पंपांचे जाळे उभारले जात आहे. सध्या प्रमुख शहरांमध्ये इथेनॉल पंप उभारले जात असून २०२७पर्यंत त्यांची संख्या पाच हजारांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची आयात करतो, ज्यासाठी परकीय चलनावर मोठा खर्च होतो. पेट्रोलला एक सक्षम पर्याय म्हणून इथेनॉलचा वापर केल्यास तेलाच्या आयातीत मोठी घट होईल, असा सरकारचा विश्वास आहे. यामुळे परकीय चलनाची बचत होईल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि देशाची ऊर्जा सुरक्षा बळकट होईल.

# सोलापूरमध्ये पीकअप गाडी विहिरीत कोसळून आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू

**माळशिरस : प्रतिनिधी**

सोलापूरच्या माळशिरसमध्ये पीकअप गाडी विहिरीत कोसळून आठ जणांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१४) घडली, तर सात जणांना स्थानिकांनी वाचवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार या गाडीतील १५ जण सोलापूरच्या रांजणी गावचे रहिवासी होते. ते देवदर्शन करून घरी परत येताना हा भीषण अपघात झाला.

माळशिरस तालुक्यातील म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाजवळ रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरीत भाविकांची पीकअप गाडी कोसळली. हा अपघात नेमका कसा घडला हे अद्याप समजू शकले नाही, पण सर्व जण म्हसवडमधील सिद्धनाथाच्या



दर्शनासाठी पीकअप गाडीने गेले होते. दर्शन घेऊन परत येताना हा अपघात झाला. यात आठ जणांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सात जणांना वाचवले.

या घटनेवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला असून मृतांच्या वारसांना सरकारकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.




**पनवेल** : एसआयआर अर्थात मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण अभियानांतर्गत भाजप कळंबोली मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक पक्षाचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाली. या बैठकीला कळंबोली मंडळ अध्यक्ष नगरसेवक अमर पाटील, महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेविका मोनिका महानवर, सरस्वती काथारा, मनाली ठाकूर, बायजा बारगजे, दमयंती भोईर, प्रतिभा भोईर यांच्यासह भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अशोक मोटे, दिलीप बिष्ट, संजय दोडके, गौरव नाईक आणि अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी एसआयआरसंदर्भातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून खेळाडूंचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आशियाई तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर फ्रेंच बॉक्सिंग (सवात) स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून पदके मिळवणाऱ्या खेळाडूंनी रविवारी (दि.१४) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी खेळाडू आणि प्रशिक्षकांचे अभिनंदन व कौतुक केले.

या खेळाडूंपैकी सीकेटी महाविद्यालयात एसवाय बीकॉममध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थी आदित्य अमोल खंडीझोड याची येत्या ९ ते १२ सप्टेंबरदरम्यान फ्रान्स येथे होणाऱ्या सवात वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी



आदित्य आणि प्रशिक्षक भूपेंद्र गायकवाड यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले तसेच सर्व खेळाडूंना भविष्यातही देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याबाबत मार्गदर्शन केले.

या भेटीवेळी माजी उपमहापौर व विद्यमान नगरसेविका सीताताई पाटील, प्रशिक्षक, आशियाई व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजयी झालेले खेळाडू आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

# रायगडचे किनारे, वॉटर पार्क पर्यटकांनी फुलले

### शाळा सुरू होण्यापूर्वी शेवटच्या वीकेण्डला गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने उकाडा कायम आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीच्या शेवटच्या वीकेण्डचा लाभ घेत हजारो पर्यटकांनी रायगडमधील समुद्रकिनारे आणि वॉटर पार्ककडे धाव घेतली. त्यामुळे अलिबाग, नागाव, मुरूड, काशिद, दिवेआगर आदी पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

शनिवार आणि रविवारी सकाळपासूनच किनारी भागात पर्यटकांची रेलचेल सुरू होती. कडक उन्हामुळे त्रस्त झालेल्या पर्यटकांनी समुद्रात पोहण्याचा आणि समुद्रकिनाऱ्यांवर वेळ घालवत गारवा



मिळवण्याचा प्रयत्न केला. अनेक कुटुंबांनी मुलांसह समुद्रकिनाऱ्यांवर सुट्टीचा आनंद लुटला. वाळूत खेळणे, समुद्राच्या लाटांमध्ये डुंबणे, घोडागाडी सफर आणि स्थानिक खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी दिसून आली.

दुसरीकडे काही नागरिकांनी आणि पर्यटकांनी जिल्ह्यातील विविध वॉटर पार्ककडेही मोठ्या प्रमाणावर मोर्चा वळवला. अलिबाग, पेण, रोहा आणि परिसरातील वॉटर पार्कमध्ये सुट्टीच्या दिवशी हाऊसफुल्ल गर्दी झाल्याचे दिसून आले. स्विमिंग पूल, वॉटर स्लाईड्स, रेन डान्स आणि विविध जलक्रीडा उपक्रमांचा आनंद घेत पर्यटकांनी उन्हापासून दिलासा मिळवला. त्यामुळे वॉटर पार्क चालक आणि पर्यटन व्यावसायिकांना चांगला रोजगार मिळाल्याचे दिसून आले.

## जेएसडब्ल्यू जेट्टीवर स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू

**उरण : बातमीदार**

जेएनपीए परिसरात जेएसडब्ल्यू ऑइल जेट्टीवर रविवारी (दि.१४) सकाळी ९ वाजता झालेल्या भीषण स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू झाला आहे. तेलवाहिनी पिगिंगचे काम सुरू असताना हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

या दुर्घटनेत राजेंद्र शिंदे (रा. करावली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी) आणि जगन्नाथ गावंड (रा. पिरकोन, ता.उरण) यांचा मृत्यू झाला आहे. घटनेनंतर दोन्ही मृतदेह उरण येथील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा व प्राथमिक तपास सुरू केला आहे तसेच जेएनपीटी प्रशासनाकडूनही स्वतंत्र चौकशी सुरू आहे.






# समृद्धी महामार्गालगत होणार वृक्ष लागवड; वन विभागाकडे जबाबदारी

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड आणि हरितीकरणाचा आराखडा आता वन विभागाच्या माध्यमातून राबविला जाणार आहे. महामार्गालगतची झाडे आणि सिंचन व्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) सामाजिक वनीकरण विभागाकडे अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आली असून, भविष्यात महामार्गाच्या कडेला सुगंधित व फुलझाडांची लागवड करण्याची योजना आहे.




वाशी येथे शनिवारी झालेल्या कार्यक्रमात एमएसआरडीसी आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात हस्तांतरण करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. समृद्धी महामार्ग हा राज्यातील सर्वात महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांपैकी एक मानला जात असला तरी त्याच्या दुतर्फा हरित पट्टा विकसित करण्याचे काम अपेक्षित गतीने पुढे सरकले नव्हते. आता ही जबाबदारी वन विभागाकडे गेल्याने वृक्षसंवर्धन आणि देखभालीच्या कामाला अधिक संघटित स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महामार्गाच्या दोन्ही बाजूंना केवळ सावलीची झाडे नव्हे तर विविध रंगांची फुलझाडे आणि सुगंधी वनस्पती लावण्याचा प्रस्ताव आहे. या माध्यमातून महामार्गावरील प्रवास अधिक आकर्षक करण्याबरोबरच पर्यावरणीय संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. राज्य शासनाच्या 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अभियानांतर्गत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

प्रशासनाकडून उपलब्ध माहितीनुसार, काही परदेशी महामार्गांच्या धर्तीवर रस्त्यालगत आकर्षक हरित पट्टे उभारण्याचा विचार करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात कोणत्या प्रजातींची लागवड होणार, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे आणि देखभालीसाठी कोणती यंत्रणा उभारली जाणार याबाबतची सविस्तर माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

महामार्गांवरील वृक्षलागवडीचे अनेक प्रकल्प सुरुवातीला गाजले असले तरी पुढील काही वर्षांत देखभाल आणि सिंचनाअभावी त्यांचे अपेक्षित परिणाम दिसून आलेले नाहीत. त्यामुळे समृद्धी महामार्गावरील प्रस्तावित हरितीकरणाचे यश हे केवळ लागवडीवर नव्हे, तर झाडांच्या दीर्घकालीन संवर्धनावर अवलंबून असणार आहे.

हस्तांतरण करारावर एमएसआरडीसीचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा आणि सामाजिक वनीकरण विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी विभागीय वन अधिकारी रामेश्वरी बोंगाळे आणि एमएसआरडीसीचे पर्यावरण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील सर्वात लांब आणि महत्त्वाच्या द्रुतगती मार्गांपैकी एक असलेल्या समृद्धी महामार्गाच्या कडेला नियोजनबद्ध हरित पट्टा उभारण्यात यश आल्यास पर्यावरणीय लाभांसह प्रवाशांसाठी अधिक सुखद अनुभव निर्माण होऊ शकतो.

# अंबरनाथमध्ये एक कोटी २० लाखांचे अवैध हायड्रोकार्बन ऑईल जप्त

## राज्य दक्षता पथकाची मोठी कारवाई

**अंबरनाथ : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्याच्या अंबरनाथ तालुक्यातील उसाटणे परिसरात न्यूओ लॉजिस्टिक पार्क येथे अवैधरित्या साठवून ठेवलेल्या मिक्स हायड्रोकार्बन ऑईलच्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी (दि.१४) कारवाई केली. या छाप्यात पथकाने सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात असलेल्या प्लॉट क्रमांक २०च्या समोर काही जण बेकायदेशीर कृत्य करत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार दक्षता पथकाने रविवारी तिथे अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान टँकरचे सील तोडून मिक्स हायड्रोकार्बन ऑईलची बेकायदेशीर साठवणूक आणि देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले.

छाप्यादरम्यान घटनास्थळावरून दोन व्यक्तींना या बेकायदेशीर प्रकारात प्रत्यक्ष सहभागी असताना ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अंबरनाथ आणि परिसरात अवैध इंधनाचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा अधिक तपास पोलीस आणि संबंधित विभाग करत आहे.



# अमेरिका-इराण युद्धामुळे कशेडी घाटातील 'डेंजर झोन'चे काम रखडले; ठेकेदार कंपनीचा दावा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या कशेडी घाटातील २००५ पासून खचणाऱ्या १०५ मीटरच्या 'डेंजर झोन' रस्त्यावर १५ मेपर्यंत काम पुर्ण होणे अपेक्षित असताना अमेरिका-इराण युद्धामुळे कशेडी घाटातील 'डेंजर झोन'चे काम रखडले असल्याचा दावा जय भारत ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी केला आहे.



जय भारत ठेकेदार कंपनीतर्फे अमित चंदनानी यांनी अमेरिका आणि इराण दरम्यानच्या युध्दपरिस्थितीमुळे आवश्यक इंधन डिझेल व जिओसिन्थेटीक कच्च्या मालाचा मोठ्या प्रमाणात पुरवठा झाला नाही. महामार्ग बांधकाम विभागाच्या निर्देशानुसार सर्व बांधकाम सामुग्री खचणाऱ्या रस्त्याच्या ठिकाणी आणण्यासाठी अतिशय कष्ट व विलंब झाला. जिथपर्यंत कातळ आहे तिथपर्यंत दरवर्षी आणणारा 'डेंजर झोन'चा १०५ मीटरचा कशेडी घाटातील रस्ता खोदून काढला. यावेळी दरवेळी केलेल्या डांबरीकरणाचे सुमारे १२ ते १५ बीटूमीन रस्त्याचे थर दिसून आले.

आयआयटी मुंबईच्या मार्गदर्शनाखाली तसेच तंत्रज्ञांनी दिलेल्या निर्देशानुसार झिंक व अल्युमिनियम कोटेड जाळ्यांचे नेटवर्क तयार करून त्यामध्ये हार्ड रॉक्सचे गॅबियन स्ट्रक्चर करून त्याला डोंगरातील कातळात १५ ते २० ड्रील करून त्यामध्ये ३० मीमी स्टील बार फिट करण्यात आले असल्याने ४५ अंशात्मक कातळातून हे गॅबियन स्ट्रक्चर सुमारे १० ते १५ वर्षे निसटणार नाही. परिणामी, यावर्षीचे 'डेंजर झोन'चे काम कायमस्वरूपी टिकाऊ असेल, अशी माहिती दिली. याठिकाणी नैसर्गिक भूजलस्त्रोत असून यातील पाणी अतिक्षारयुक्त असल्याने स्टील गंजून नष्ट होत असे. मात्र झिंक व अल्युमिनियम कोटेड जाळ्या या क्षारयुक्त भुजलामुळे गजणार नसल्याचे जय भारत ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी सांगितले.

यावेळी कोंढवीचे माजी सरपंच सुहास मोरे यांनी, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, महाविद्यालय, बाजारहाट यासाठी १२ गावांसह २८ वाड्यावस्त्यांचे जनजीवन या 'डेंजर झोन'चे काम रखडल्याने रस्ता संपर्क तुटून बाधित होणार आहे. जय भारत ठेकेदार कंपनीतर्फे या जनतेसाठी खासगी प्रवासी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी स्थानिकांच्या वतीने करून पावसाळ्यात रस्ता बंद ठेवण्याची वेळ ओढवली तर उग्र आंदोलनाचा इशारा यावेळी दिला.

# रक्तदान चळवळ अधिक सक्षम करण्याचा फ्रेंड्स ग्रुपचा निर्धार!

**महाड : प्रतिनिधी**

पनवेल ते कोकणापर्यंत सर्वसामान्य गरजू रुग्णाची अत्यावश्यकता असणारे रक्ताची गरज पूर्ण करणाऱ्या जनकल्याण रक्त केंद्र महाड व्यवस्थापनाच्या सहकार्यातून रक्तदान चळवळ अधिक सक्षम करण्याचा निर्णय आजच्या जागतिक रक्तदान दिनानिमित्त मागील तीन दशकांपासून सामाजिक शैक्षणिक क्रीडा पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या फ्रेंड्स ग्रुपने निर्धार केल्याची माहिती या संस्थेचे अध्यक्ष सुदेश कलमकर यांनी दिली आहे.



आजच्या जागतिक रक्तदान दिनानिमित्त फ्रेंड्स ग्रुपच्या सदस्यांनी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येऊन छत्रपतींच्या साक्षीने या चळवळीसाठी अधिक सक्षमपणे व तन-मन-धनाने कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतली.

मागील काही काळात रुग्णांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन रक्ताची झालेली कमतरता ही गंभीर समस्या समाजासमोर निर्माण होत असून त्यावर मात करण्यासाठी फ्रेंड्स ग्रुप स्वतःबरोबरच महाड व परिसरातील सामाजिक संस्थांच्या सहकार्यातून एकत्रितपणे आगामी काळात काम करण्याचा निर्णय करीत असल्याचे अध्यक्ष सुदेश कलमकर यांनी स्पष्ट केले.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात महाड शेजारील असलेली औद्योगिक वसाहत या सर्व बाबींची गंभीरतेने जाणीव ठेवून आगामी काळात सर्वश्रेष्ठ दान म्हणून पवित्र असलेल्या रक्तदान चळवळ अधिक सक्षम करण्याकरता आम्ही वृत्त असल्याचे या जागतिक रक्तदान दिनी त्यांनी स्पष्ट केले.

# चरई येथे एसटी बसच्या धडकेने मोटरसायकलस्वार जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चरई-सोनारवाडी परिसरातील अवघड वळणावर एसटी बसची मोटरसायकलला धडक बसून झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला. रविवारी दुपारी झालेल्या या अपघातामुळे एसटीचालकाबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आल्याने तणाव निर्माण झाला.

बोरावळे-पोलादपूर मार्गावरील एसटी बस चालक दत्तात्रेय दराडे हे बस पोलादपूरच्या दिशेने घेऊन परत येत होते. त्याचवेळी चरई बाजूकडून घागरकोंड गावाकडे जाणारी मोटरसायकल समोरून येत होती. चरई-सोनारवाडी येथील वळणावर दोन्ही वाहने समोरासमोर आल्याने धडकली. या अपघातात मोटरसायकलस्वार नारायण खेडेकर गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी तातडीने महाड येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस, भाजप तालुकाध्यक्ष वैभव चांदे, युवा सेनेचे दत्ता मोरे यांनी घटनास्थळी मदतकार्य केले.



# आज शाळेची घंटा वाजणार! प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे होणार स्वागत

**तळा : प्रतिनिधी**

आज १५ जून रोजीपासून शाळेची घंटा वाजत असून तळा तालुक्यात शाळांची स्वच्छता करून शाळांमधे प्रवेशोत्सवाची तयारी केल्याचे पहावयास मिळत आहे.

शाळा प्रवेशोत्सव व शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेच्या गावातील असणाऱ्या अधिकारी, पदाधिकारी,पालक इत्यादीना निमंत्रण देण्यात आली आहेत.व शाळेत प्रवेशोत्सव चांगल्या पध्दतीने मोठ्या उत्साहात साजरा होण्याचे दृष्टीने शाळा प्रमुख,शिक्षक हे प्रयत्न करत आहेत.त्याच बरोबर प्रवेशपात्र विद्यार्थी,पालक यांना भेटी देत आहेत.तसेच पट वाढविणे साठी ही शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक प्रयत्न करत आहेत.आपल्या शाळेचा पट वाढविणे साठी शाळेत दिल्या जाणाऱ्या सुविधा व दर्जेदार शिक्षण पध्दती यांची माहिती देत आहेत.



शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशाचा लाभ देण्यात येणार आहे.दररोजचे मध्यान्ह भोजन व विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या शासकीय योजना व शिष्यवृत्त्या यांचाही लाभ दिला जाणार आहे.

पहिल्याच दिवशीच्या शाळेसाठी मुंबई पुणे कडे सुट्टीत गेलेले विद्यार्थी गावाकडे परतले आहेत. शाळेची उत्सूकता व आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळत आहे.तळा तालुक्यतील पालकांशी संवाद साधला असता पालकांकडून जिल्हा परिषद शाळांकडे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा कल असल्याचे दिसून येत आहे.विद्यार्थ्यांनी वह्या,छत्री,रेनकोट,पाणी बॉटल, दप्तर, इत्यादी साहित्य खरेदी करत असल्याचे मिळत आहे.

# सेवा, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने पनवेल रेल्वे स्थानक येथे व्हीलचेअर दान उपक्रम आयोजित करण्यात आला होता . दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक तसेच गरजू प्रवाशांच्या सुविधेसाठी करण्यात आलेला हा उपक्रम समाजसेवेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

याप्रसंगी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, पनवेल रेल्वे स्थानक व्यवस्थापक कृष्णा अग्रवाल, रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा रोटेरियन स्मिता मांडलिक, सचिव रोटेरियन डॉ. अरविंद कुलकर्णी तसेच खजिनदार रोटेरियन श्याम जहागीरदार यांची उपस्थिती लाभली.

यावेळी प्रितम म्हात्रे यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास" या विचारधारेनुसार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सुविधा व सन्मान पोहोचविण्याचे कार्य अशा उपक्रमांतून अधिक प्रभावीपणे घडत असल्याचे सांगून रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले .





# सारळ येथील हायप्रोफाईल सोसायटीत गांजा सेवन; स्थानिक दोघांसह व्हिसा संपलेल्या युक्रेनियन महिलेवर गुन्हा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अमली पदार्थविरोधी मोहिमेला गती देत, रायगड पोलिसांनी अलिबाग तालुक्यातील सारळ येथील एका हायप्रोफाईल सोसायटीत छापा टाकला. या छाप्यात गांजा सेवन करणाऱ्या दोन ज्येष्ठ नागरिकांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्याच ठिकाणी बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या एका विदेशी महिलेलाही ताब्यात घेण्यात आले आहे. मांडवा सागरी पोलीस ठाण्यात याप्रकरणी एन.डी.पी.एस आणि इमिग्रेशन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, रविवार, १४ जून रोजी पहाटेच्या सुमारास सारळ (ता. अलिबाग) येथील 'इनर सर्कल सोसायटी', मध्ये स्थानिक गुन्हे शाखा व मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने अचानक छापा टाकला.या कारवाईदरम्यान संबंधित रूममध्ये काही व्यक्ती पार्टी करत असल्याचे पोलिसांना आढळून आले. तेथे दोन व्यक्ती कागदी नळीमध्ये भरलेला पदार्थ पेटवून त्याचा धूर ओढताना,अंमली पदार्थाचे सेवन करताना रंगेहाथ पकडल्या गेल्या. त्यांची अधिक चौकशी केली असता ते गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करत असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी पोलिसांनी सुनील बळीराम चावला ,वय ६९ वर्षे, व हरेंद्र सिंग मंगल सिंग ,वय ६५ वर्षे, या दोघांना अटक केली आहे.आरोपींच्या ताब्यातून गांजा भरलेल्या कागदी नळ्या, अर्धवट जळालेली गांजाची नळी आणि लायटर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाचे एकूण वजन अंदाजे तीन ग्रॅम इतके आहे.

याच कारवाईदरम्यान घटनास्थळावर युक्रेन देशाची एक महिला उपस्थित असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी तिच्या पासपोर्ट आणि व्हिसाच्या कागदपत्रांची कसून पडताळणी केली असता, तिचा व्हिसा अवघ्या दोन दिवसांपूर्वी म्हणजेच दिनांक १२ जून २०२६ रोजी संपल्याचे समोर आले. भारतात राहण्यासाठी कोणतीही वैध व समाधानकारक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने, या परदेशी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही धडक कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि अलिबाग विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाई पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील, सहा. फौजदार प्रसन्न जोशी, किशोर पाटील तसेच पोलीस अंमलदार विनोद पाटील, प्रतीक सावंत, रणजीत खराले, कौस्तुभ मगर, अमोल हंबीर, झुलिता भोईर, चेतन म्हात्रे, अक्षय पाटील आणि अनिकेत म्हात्रे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# महापालिकेच्या माध्यमातून होणार पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकीचे नूतनीकरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसराचे सुशोभीकरण करून चौकी नव्याने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेवकांसोबत रविवारी (दि. १४) संयुक्त पाहणी करण्यात आली. बीट चौकीच्या पाहणीनंतर उपस्थित पनवेल महानगरपालिका व स्थानिक नगरसेवकांनी चौकीचे व परिसराचे नूतनीकरणाचे काम येत्या काही दिवसांत सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.



दरम्यान, कायदा-सुव्यवस्था तसेच वाहतूक कोंडीच्या दृष्टीने पनवेल रेल्वे स्टेशन परिसराचीदेखील पाहणी करण्यात आली. पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसर पाहणीसाठी वपोनि नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे अधिकारी शैलेश जाधव, तसेच पनवेल महानगरपालिका विद्यमान नगरसेवक मनोज भुजबळ, शिवानी घरत, प्रियंका कांडपिळे, अस्मिता घरत, माजी नगरसेवक सुनील बहिरा, तेजस कांडपिळे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम हे उपस्थित होते. यावेळी परिसराची पूर्ण पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले.

**याबाबत आम्ही पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच नगरसेवक परेश ठाकूर यांना या विभागातील सात नगरसेवकांचे पत्र देऊन या चौकीचे नूतनीकरण पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून लवकरात लवकर करून घेण्यासाठी पाठपुरावा करू.**

**-मनोज भुजबळ, नगरसेवक**



**पनवेल : भाजप कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी जात त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी नगरसेवक हॅप्पी सिंग, भाजप उत्तर रायगड सोशल मीडिया संयोजक सुशील शर्मा, युवा मोर्चा कामोठे शहर मंडळ अध्यक्ष तेजस जाधव, उत्तम जरग, जयेंद्र जोशी, मनोहर शिंगाडे, सुरेंद्र हल्लीकर, समीर गंगाधरे, नितीन कवडे, विजू कुंभार आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी हर्षवर्धन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## सराईत दुचाकीचोर गजाआड; चार गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमधून दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे. चेतन कातकर (३४) असे त्याचे नाव असून, त्याने कामोठे व कळंबोली पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील केलेले एकूण चार वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यातील एक दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्याच्याकडून आणखी काही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

निहार पाल (२३) या तरुणाने खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये त्याची दुचाकी पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. निहार सायंकाळी परत आल्यानंतर त्याला दुचाकी चोरीस गेल्याचे निदर्शनास आले होते. त्यावर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर पो.नि. मनोहर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. गणेश दळवी, पीएसआय प्रतापसिंह चव्हाण, पो.हवा. संजय झोळ, प्रशांत जाधव, कुणाल म्हात्रे, पो.ना. सचिन ठोंबरे, पो.शि. दत्ता जाधव, राजेंद्र इलग, प्रमोद कोकाटे व त्यांच्या पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यात त्यांना आढळलेला संशयिताचा फोटो त्यांनी येथील गॅरेज चालक, पार्किंग कर्मचारी व इतरांना दाखवला होता. त्याच्या चार दिवसांनंतर तो पुन्हा खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या पार्किंग परिसरात आल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने त्याचे नाव चेतन कातकर असून तो मुंबईतील वडाळा पश्चिम येथील गणेश नगर परिसरात राहत असल्याचे सांगितले. तसेच त्याने वाहनचोरीचे आणखी गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली.

त्यात कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन व कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक असे चार गुन्हे केल्याचे सांगितले. त्यावर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त केली आहे.

## ५२ वर्षीय व्यक्तीला ६.१० लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

विम्याचे अडकलेले पैसे आणि त्यावर मोठा परतावा मिळवून देण्याच्या बहाण्याने एका सायबर टोळीने कामोठ्यातील एका ५२ वर्षीय व्यक्तीला तब्बल सहा लाख १० हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार राजीव चव्हाण (५२) हे कामोठे सेक्टर २१ मध्ये राहणारे असून, ते तळोजा एमआयडीसी येथील एका नामांकित कंपनीत नोकरी करतात. २०१६ मध्ये त्यांनी घेतलेल्या क्रेडिट कार्डसोबत त्यांना एक इन्शुरन्स पॉलिसी मिळाली होती. चव्हाण यांनी त्या पॉलिसीचा फक्त पहिलाच हप्ता भरला होता. नेमकी याचीच माहिती मिळवून एका सायबर टोळीने वर्षभरापूर्वी आशिष गिडवानी नावाने चव्हाण यांच्याशी संपर्क साधला होता. या सायबर चोरट्याने चव्हाण यांना जुन्या पॉलिसीचे पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून, श्रीराम लाइफ इन्शुरन्सच्या दोन नवीन पॉलिसी काढण्यास भाग पाडले.

या पॉलिसीचे दोन हप्ते भरून घेतल्यानंतर चोरट्याने आपला फोन बंद केला. त्यानंतर जुलै २०२५ मध्ये विकास गर्ग नावाच्या दुसऱ्या सायबर चोरट्याने फोन करून श्रीराम लाइफ इन्शुरन्स पॉलिसीचे पैसे काढून देण्याचे आमिष दाखवले.

## ऑनलाइन गेमिंगच्या नादात रिक्षाचालकाने गमावले १.२६ कोटी

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाइन गेमिंगमधून घरबसल्या करोडपती होण्याच्या नादात एका २५ वर्षीय तरुणाने एक कोटी २६ लाख ८६ हजार ७७८ रुपये गमावल्याची खळबळजनक घटना उलवेत उघडकीस आली. या रिक्षाचालक तरुणाला सायबर टोळीने ऑनलाइन गेमिंगमध्ये अडकवून ही रक्कम उकळल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी अज्ञात सायबर टोळीसोबतच गेमिंग अॅपचालकांविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

हा तरुण उलवेत राहत असून रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. २०२४मध्ये इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पाहत असताना त्याला या अॅपची जाहिरात दिसली. गेम खेळून पैसे जिंकण्याचे आणि ते त्वरित बँक खात्यात जमा करण्याचे आकर्षक आमिष जाहिरातीत देण्यात आले होते.

या आमिषाला बळी पडून त्याने या लिंकवरून अॅप डाऊनलोड केले व स्वतःचा आयडी तयार केला. या तरुणाने गेमिंग पेजवर उपलब्ध असलेल्या तीन पत्ती, कॅसिनो, क्रिकेट व फुटबॉलसारख्या गेम्सवर सुरुवातीला कमी रकमेने खेळण्यास सुरुवात केली.

सायबर टोळीने सुरुवातीला तरुणाने जिंकलेली छोटी रक्कम खात्यावर जमा केली. पुढे मोठा नफा मिळेल या आशेने तो त्यांच्या विळख्यात अडकत गेला. त्याने २९ मार्च २०२४ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत फोनपे व वेगवेगळ्या यूपीआय आयडीद्वारे ४००पेक्षा जास्त वेळा पैसे ट्रान्सफर केले आहेत.

यात त्याने १,२६,८६,७७८ रुपये गेममध्ये लावले. त्याच्या गेमिंग अकाऊंटमध्ये त्याने जिंकलेल्या रकमेमध्ये तब्बल ९० लाख रुपयांची रक्कम दाखवण्यात येत होती, मात्र त्याला ती काढता येत नव्हती. काही दिवसांनी त्याच्या स्क्रीनवरून ९० लाखांची रक्कमही दिसेनाशी झाली.

## 'लायन्स सरगम'चा पदग्रहण सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेलने गेल्या तीन वर्षांत जे उत्कृष्ट कार्य केले आहे ते फारच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन संतोष शेट्टी यांनी गोखले सभागृह पनवेल येथे झालेल्या लायन्स क्लब सरगमच्या नवीन पदग्रहण सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर संतोष शेट्टी यांच्यासोबत विशेष अतिथी विजय गणात्रा, रिजन चेअरमन अल्केश शहा, झोन चेअरमन नारायण कट्टी होते. या कार्यक्रमात सरगम क्लबचे सन २०२६-२७ चे अध्यक्ष म्हणून आदित्य दोशी यांनी पदभार स्वीकारला.



सरगम क्लबचे मावळते अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी उपस्थितांचे स्वागत करून गेल्या वर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला व मल्टिपल डिस्ट्रिक्टतर्फे क्लबला विविध पारितोषिकांनी सन्मानित केल्याचे सांगितले. प्रेमेंद्र बहिरा यांच्यातर्फे गतवर्षी त्यांना सहकार्य केलेल्या सभासदांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सरगम क्लबमध्ये नवीन सभासद झालेल्या सुरेखा भुजबळ, गीतेश नवधरे, किरण पाटील यांना विशेष अतिथी प्रथम प्रांतपाल विजय गणात्रा यांनी सभासदत्वाची शपथ दिली.

नवनिर्वाचित अध्यक्ष आदित्य दोशी यांनी अध्यक्ष म्हणून कामाची संधी दिल्याबद्दल सरगम क्लबच्या सभासदांचे आभार मानले. यावर्षीही विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करून सरगम क्लबची परंपरा पुढे नेणार असल्याचे सांगितले. आदित्य दोशी यांनी कारकिर्दीचा पहिला उपक्रम म्हणून साई आश्रय वृद्धाश्रम येथे किराणा सामान देण्यात आले. एका गरजू महिलेला शिलाई मशीन देण्यात आली. मुख्य अतिथी संतोष शेट्टी यांनी नवनिर्वाचित सचिव मानदा पंडित, खजिनदार अनिल परमार, सहसचिव सुषमा पन्हाळे, सहखजिनदार मिलिंद जोशी, उपाध्यक्ष संध्या महानुभाव, जयेश मणियार, टेमर मोहिनी जोशी, टेलट्विस्टर महेंद्र लोहार व संचालक म्हणून संजय गोडसे, स्वाती गोडसे, अल्केश शहा, राजेंद्र महानुभाव, धवल शहा यांना पदाची शपथ दिली.

विजय गणात्रा यांचा परिचय राजेंद्र महानुभाव तर संतोष शेट्टी यांचा परिचय संजय गोडसे यांनी करून दिला. सूत्रसंचालन स्वाती गोडसे यांनी केले. कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट पदाधिकारी सत्यपाल चुघ, अनुप थरवाणी, अनिल म्हात्रे, सुयोग पेंडसे, सुरभी पेंडसे, उलवे क्लबचे मिलिंद पाटील, उमेश जाधव, द्रोणगिरी क्लबचे मोनिका चौकर, सागर चौकर, लिओ काळसेकरचे अली खान आणि सभासद, ओंकार खेडकर, अंकिता म्हात्रे तसेच पनवेल आणि परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

## पोलिसांच्या वाहनाला दुचाकीची धडक

**नवीन पनवेल** : पोलिसांच्या वाहनाला दुचाकीने धडक देत झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघे जण जखमी झाले. या अपघातप्रकरणी ईशान राजीव (२०, राहणार सेक्टर १७, रोडपाली) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ११ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार अजय मोरे हे दहशतवादविरोधी पथक, नवी मुंबई येथे कार्यरत आहेत. ते वाहन क्रमांक एमएच ०१ ईएन ६४४२ हे लोटस हॉस्पिटल, रोडपाली येथील टी पॉइंट येथे वळण घेऊन पोलीस मुख्यालयाकडे जात होते. यावेळी ईशान याने मोटरसायकल क्रमांक एमएच ४६ सीएस ०१४१ ही फुडलँड सिग्नलकडून पुरुशार्थ ब्रिजकडे जाणाऱ्या रस्त्यावर स्पीड ब्रेकरकडे दुर्लक्ष करून वेगाने चालवली आणि सरकारी वाहनाला समोरील बाजूने ठोकर मारली. या अपघातात ईशान राजीव आणि त्याच्या पाठीमागे बसलेली श्रिया गोरे जखमी झाली.

## साडीच्या आमिषाने वृद्धेचे दागिने लंपास

**नवीन पनवेल** : आमचे शेठ सरदार यांना १० वर्षांनंतर मुलगा झाला आहे, तुम्हाला साडी भेटली का, असे सांगून ५४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील दोन लाख ३० हजार रुपयांचे दागिने फसवून नेल्याप्रकरणी तिघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ११ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगल कोरडे या कळंबोली सेक्टर ४ येथे राहत असून त्या सावंत फ्लोअर मिल येथे दळण टाकून घरी परत जात होत्या. यावेळी तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले आणि पुढच्या गल्लीमध्ये गरीब महिलांना साड्या आणि बक्षीस वाटप सुरू असल्याचे सांगितले. यावेळी आमचे शेठ सरदार यांना १० वर्षांनंतर मुलगा झाला आहे. तुम्हाला साडी भेटली का, असे सांगून त्यांना सेक्टर ३, सह्याद्री सोसायटी, कळंबोली येथे घेऊन गेले. येथे दिशाभूल करून सोन्याचे मंगळसूत्र, चेन आणि अंगठी घेऊन ते पळून गेले.

## उरणमधील शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत

**उरण : प्रतिनिधी**

शेतीच्या खरीप हंगामातील पेरणीपूर्वी मशागतीची कामे उरकली असून शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. जून महिना मध्यावर आला असतानादेखील पेरणीयोग्य पाऊस पडत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या असून पेरणीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे.

खरीप हंगाम हा जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. म्हणून आजही जिल्ह्यात शेतीला खूप महत्त्व दिले जात आहे. मृग नक्षत्राची पेरणी खरीपासाठी उत्तम असते. त्यामुळे चांगला पाऊस मृग नक्षत्रात होईल, या आशेने शेतकऱ्यांनी महागडी बी-बियाणे, खतांची जमवाजमव आणि शेतीची मशागत केली, मात्र पेरणी योग्य पाऊस होत नसल्यामुळे पेरणी करावी की न करावी, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. समजा कधीतरी पावसाच्या बरसणाऱ्या सरीवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी पेरणी केलीच, तर बियाणे वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. खाडी भागात धूळ वाफेवरची पेरणी शेतकऱ्यांनी करून घेतली आहे. मात्र बेभरवशाच्या पावसाचा असाच दडीचा गोंधळ सुरू राहिला तर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येऊन शेतकऱ्यांना आर्थिक झळ बसेल.

जून निम्म्यावर आला असताना पावसाने दडी मारल्याने ग्रामीण भागातील भूजल साठ्यांनी तळ गाठला. त्यामुळे पाणीटंचाईची झळ बसत आहे. तीव्र उकाड्याने नागरिकही हैराण झाले आहेत. कधी एकदा पाऊस पडेल याची शेतकऱ्यांसह नागरिक दररोज चातकासारखी वाट पाहत आहेत.

## वृद्ध महिलेचे दागिने पळविले

**नवीन पनवेल** : ८० वर्षीय महिलेला दोन अनोळखी इसमांनी कपडे, पैसे व खाऊचे आमिष दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ११ जूनला गुन्हा दाखल करण्यात आला. रामूबाई घरत खारकोपर येथे राहत असून ११ जूनला सकाळी साडेअकराच्या सुमारास शिवाजी चौक, पनवेल येथे खरेदीसाठी आल्या होत्या. यावेळी दोन अनोळखी इसमांनी त्यांना कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या गळ्यातील दागिने पिशवीत काढण्यास सांगितले. बिस्कीट पुडे पिशवीत ठेवण्याच्या बहाण्याने पिशवीतून त्यांचे दागिने आणि पैसे काढून घेऊन त्यांची फसवणूक केली.

# वाड्यांपासून टॉवर्सपर्यंत : रायगडचे प्रवेशद्वार पनवेलची बदलती ओळख

पनवेल हे नाव उच्चारताच डोळ्यांसमोर येते एक जुनं, निवांत गाव, चिंचोळ्या गल्ल्या, कौलारू घरे, मोठमोठे वाडे आणि मधोमध असलेला शेकडो वर्षे जुना बाजार, पण आजचे पनवेलचे चित्र पार बदलून गेले आहे. रायगड जिल्ह्याचे प्रवेशद्वार असलेले हे शहर गेल्या २५ वर्षांत इतके बदलले की जुने जाणकारही कधी कधी रस्ता चुकतात. वाड्यांच्या जागी आता टोलेजंग टॉवर्स उभे राहिले आहेत आणि बैलगाडीच्या जागी मेट्रोचे स्वप्न पाहिले जात आहे. पनवेलचे भौगोलिक स्थान हेच त्याच्या विकासाचे मुख्य कारण ठरले आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, सायन-पनवेल महामार्ग आणि पनवेल-उरण रेल्वेमार्ग या चारही महत्त्वाच्या मार्गांचे जंक्शन पनवेल आहे.

त्यामुळे उत्तरेकडून कोकणात किंवा गोव्यात जाणारा प्रत्येक प्रवासी पनवेलला स्पर्श करूनच पुढे जातो. ब्रिटिश काळातही पनवेल हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. येथून भात, मीठ आणि भाजीपाला मुंबईला पाठवला जात असे. वडाळे तलावाच्या काठावर भरणारा आठवडे बाजार आजही पनवेलची जुनी ओळख जपून आहे. १९९० नंतर नवी मुंबई शहराचा विकास सुरू झाला आणि पनवेलचे महत्त्व अधिकच वाढले. सिडकोने पनवेलच्या आसपास नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, करंजाडे असे नियोजित नोड विकसित केले. प्रशस्त रस्ते, नियोजनबद्ध सेक्टर्स, बगीचे, शाळा, कॉलेज यामुळे मुंबईतील गर्दीपासून दूर पण मुंबईला जोडलेले घर घेण्यासाठी मध्यमवर्गीयांचा ओढा पनवेलकडे वाढला.



कळंबोली येथील स्टील मार्केट आणि ट्रान्सपोर्ट हबमुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला. कामोठे आणि खारघर तर शैक्षणिक हब म्हणून नावारूपाला आले. येथे इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंटची मोठमोठी कॉलेजेस आहेत. २०१६ साली पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली आणि शहराच्या विकासाला अधिक गती मिळाली. आता पनवेल महापालिका हद्दीत २९ गावे आणि सिडकोचे ६ नोड येतात. महानगरपालिकेमुळे रस्ते, पाणी, घनकचरा व्यवस्थापन यांसारख्या नागरी सुविधांवर भर दिला जात आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, तालुका क्रीडा संकुल यामुळे शहराच्या सांस्कृतिक जीवनातही भर पडली आहे. भविष्याचा विचार करता पनवेलचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

येथून हाकेच्या अंतरावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. विमानतळाला जोडण्यासाठी उलवे-पनवेल रोड आणि अटल सेतू आधीच तयार आहेत. शिवाय पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाचे काम पूर्ण झाल्यावर कर्जत अवघ्या २० मिनिटांवर येईल. नेरूळ-उरण रेल्वेमार्गामुळे जेएनपीटी आणि उरण थेट लोकलने जोडले गेले आहेत.

एकीकडे हा आधुनिक विकास सुरू असताना पनवेलने आपला इतिहासही जपला आहे. थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव शिरढोण पनवेलपासून जवळच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला कर्नाळा किल्ला आणि अभयारण्य हे पनवेलची ऐतिहासिक आणि नैसर्गिक ओळख आहे. पनवेलजवळील गाडेश्वर तलाव आणि त्याकाठची पुरातन मंदिरे अजूनही शांतता देतात. जुन्या पनवेलमधील वडाळे तलाव, टपाल नाका, एमजी रोड येथील दुकाने आजही त्याच थाटात उभी आहेत. सकाळी भाजी मार्केटमध्ये होणारी लगबग, सायंकाळी वडापावच्या गाडीवरची गर्दी हे चित्र अजूनही बदललेले नाही. फक्त त्या गर्दीत आता नव्या टाऊनशिपमधून आलेली नवी पिढीही सामील झाली आहे. वाड्यांमध्ये राहणारे जुने पनवेलकर आणि टॉवर्समध्ये राहणारे नवे पनवेलकर आता एकत्रितपणे या शहराची नवी ओळख घडवत आहेत. विकास आणि परंपरा यांची सांगड घालत पनवेल रायगडचे खरेखुरे प्रवेशद्वार ठरत आहे. (साभार : इंटरनेट)

## संपादकीय

# ऊर्जा स्वावलंबनाची झेप

भारताच्या ऊर्जा क्षेत्रात मोठ्या परिवर्तनाची नांदी ठरणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय नुकताच समोर आला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी शंभर टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना मंजुरी देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याची माहिती दिली. पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी करून ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

**भारत हा जगातील सर्वाधिक ऊर्जा वापरणाऱ्या देशांपैकी एक आहे. देशाच्या पेट्रोलियम गरजांपैकी मोठा हिस्सा आयातीद्वारे भागविला जातो. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये होणाऱ्या चढ-उतारांचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि सर्वसामान्यांच्या खिशावर होतो. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या वापरामुळे परकीय चलनाचा मोठा खर्च होत असतो. अशा परिस्थितीत स्वदेशी आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा शोध घेणे ही काळाची गरज बनली होती. इथेनॉल हे त्यातील एक प्रभावी उत्तर म्हणून पुढे आले आहे. इथेनॉल हे ऊस, मका, तांदूळ आणि इतर जैविक स्रोतांपासून तयार होणारे जैवइंधन आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला आहे. सुरुवातीला दहा टक्के मिश्रणाचा टप्पा गाठल्यानंतर आता वीस टक्के मिश्रणाच्या दिशेने देश वाटचाल करीत आहे. या पार्श्वभूमीवर शंभर टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना मंजुरी मिळणे ही एक मोठी झेप मानावी लागेल. या निर्णयाचा सर्वात मोठा लाभ म्हणजे ऊर्जा स्वावलंबन. भारताला दरवर्षी कच्च्या तेलाच्या आयातीसाठी अब्जावधी डॉलर खर्च करावे लागतात. आयात कमी झाल्यास परकीय चलनाची मोठी बचत होईल. जागतिक राजकीय घडामोडी, युद्धजन्य परिस्थिती किंवा तेल उत्पादक देशांच्या धोरणांमुळे इंधनाच्या किमतींमध्ये होणारी अस्थिरता कमी करण्यासही मदत होईल. स्वदेशी इंधनाचा वापर वाढल्यास देशाची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत होऊ शकते. इथेनॉलचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे शेतकऱ्यांचे हित. साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी इथेनॉल निर्मिती हा उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत ठरू शकतो. अनेकदा साखरेचे उत्पादन वाढल्याने साखर कारखान्यांवर आर्थिक ताण निर्माण होतो. अशा वेळी अतिरिक्त उसाचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करता येतो. त्यामुळे कारखान्यांना आर्थिक स्थैर्य मिळते आणि शेतकऱ्यांच्या थकबाकीचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास मदत होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याची क्षमता या धोरणात आहे. पर्यावरणाच्या दृष्टीनेही इथेनॉलचे महत्त्व मोठे आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत इथेनॉल जळताना कमी प्रमाणात प्रदूषण निर्माण करते. कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या जागतिक प्रयत्नांमध्ये भारतानेही महत्त्वपूर्ण उद्दिष्टे निश्चित केली आहेत. हरितगृह वायूंचे प्रमाण कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देणे हे त्यातील प्रमुख घटक आहेत. इथेनॉलचा वाढता वापर या उद्दिष्टांना पूरक ठरू शकतो. केंद्र सरकारचा हा निर्णय केवळ इंधन बदलण्यापुरता मर्यादित नाही, तर तो आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक परिवर्तनाचा एक व्यापक दृष्टिकोन दर्शवितो. इथेनॉल हे भविष्याचे एकमेव उत्तर नसले तरी ते भविष्याच्या ऊर्जाव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक ठरू शकते. शंभर टक्के इथेनॉलला मंजुरी देण्याचा निर्णय हा भारताच्या ऊर्जा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदला जाईल. या निर्णयातून स्वदेशी संसाधनांवर आधारित विकासाची दिशा स्पष्ट होते. ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने सुरू झालेल्या या प्रवासाला यशस्वी करण्यासाठी सरकार, उद्योग आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे हीच काळाची गरज आहे.**

# महाराष्ट्रातील अध्यात्म साहित्य : परंपरा आणि प्रवाह



महाराष्ट्राची भूमी ही संतांची, वारकऱ्यांची आणि विचारवंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. इथल्या मातीत भक्तीचा, ज्ञानाचा आणि कर्तव्याचा त्रिवेणी संगम घडला. या संगमातून जे साहित्य निर्माण झाले, त्याला आपण 'अध्यात्म साहित्य' म्हणतो. हे केवळ देव-देवतांच्या स्तुतीचे किंवा कर्मकांडाचे साहित्य नाही. तर माणसाने माणसाशी कसे वागावे, समाजाने कोणत्या मूल्यांवर उभे राहावे आणि परमेश्वराशी नाते कसे जोडावे याचा हा जिवंत दस्तऐवज आहे. महाराष्ट्रातील अध्यात्म साहित्य हे समाजाला जागे करणारे, घडवणारे आणि जोडणारे साहित्य आहे.

या साहित्याचा पाया बाराव्या-तेराव्या शतकात रचला गेला. त्यापूर्वी महानुभाव पंथाचे चक्रधर स्वामी यांनी मराठी भाषेला प्रतिष्ठा दिली. 'लीळाचरित्र' आणि 'सिद्धांतसूत्रपाठ' यांसारख्या ग्रंथांतून त्यांनी साधे, सोपे आणि आचारशुद्ध जीवन जगण्याचा मार्ग सांगितला. मूर्तिपूजेला विरोध, स्त्री-शूद्रांना मोक्षाचा अधिकार आणि कर्मकांडापेक्षा आचरणाला महत्त्व, ही त्यांची शिकवण होती. महानुभाव साहित्याने मराठी गद्याला पहिली बैठक दिली. मात्र, या पंथाचे साहित्य दीर्घकाळ गुप्त राहिले.

खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे अध्यात्म साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले. या चळवळीचे आद्य प्रणेते संत ज्ञानेश्वर महाराज. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनी 'ज्ञानेश्वरी' अर्थात 'भावार्थदीपिका' लिहिली. संस्कृतातील भगवद्गीता मराठीत आणून त्यांनी तत्त्वज्ञानाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. 'माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातेंही पैजा जिंके' हा विश्वास त्यांनी मराठीला दिला. ज्ञानेश्वरी ही केवळ टीका नाही, तर ती एक स्वतंत्र, रसाळ, काव्यमय आणि तत्त्वचिंतनाने ओथंबलेली कृती आहे. ज्ञानदेवांनी 'अमृतानुभव' या ग्रंथातून अद्वैत तत्त्वज्ञान मांडले, तर 'चांगदेव पासष्टी'तून योगमार्गातील गूढ उकलले. त्यांनी 'वारी'ची परंपरा सुरू करून विठ्ठलभक्तीला लोकचळवळीचे रूप दिले.

ज्ञानदेवांच्या पाठोपाठ नामदेवांनी भागवत धर्माचा झेंडा पंजाबपर्यंत नेला. त्यांचे अभंग म्हणजे भक्तीचा कल्लोळ. 'नामदेवा कीर्तन करी, पुढे देव उभा' या भावनेतून त्यांनी विठ्ठलाला सखा, सोयरा बनवले. नामदेवांनी जातीभेदावर प्रहार केला आणि 'केला महार तरी ऐसा' म्हणत समतेचा पुरस्कार केला. त्यांची हिंदी पदे आजही शीख धर्मग्रंथ 'गुरुग्रंथ साहिब'मध्ये आदराने गायली जातात.

चौदाव्या शतकात संत एकनाथांनी लोकजागृतीचे मोठे काम केले. 'एकनाथी भागवत' आणि 'भावार्थ रामायण' या ग्रंथांतून त्यांनी प्रपंच आणि परमार्थाची सांगड घातली. 'बारा वर्षे अभ्यास करूनि, मग प्रपंच करी नेटका' हा त्यांचा संदेश होता. त्यांनी भारुडे लिहून समाजातील दांभिकपणावर कोरडे ओढले. अस्पृश्य मानल्या गेलेल्या मुलाला घरी जेवू घालून त्यांनी कृतीतून समता शिकवली. 'रंजल्या गांजल्याची सेवा हाच खरा धर्म' हा विचार त्यांनी दिला.

सतराव्या शतकात संत तुकारामांनी अध्यात्म साहित्याला कळसावर नेले. 'अभंग' हा काव्यप्रकार त्यांनी आपलासा केला. तुकोबांचे अभंग म्हणजे वेदान्त रस्त्यावर आला. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे', 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' या ओळींतून त्यांनी विश्वात्मक देव पाहिला. 'बुडती हे जन, न देखवे डोळा' या तळमळीतून त्यांनी समाजातील अनाचार, ढोंग, व्यभिचार यांवर प्रहार केला. त्यांच्या गाथेत ४५०० हून अधिक अभंग आहेत. प्रत्येक अभंग हा अनुभवाच्या अग्नीतून तावून सुलाखून निघालेला आहे. म्हणूनच तुकाराम हे लोकसंत ठरले.

तुकारामांच्या समकालीन संत रामदास स्वामींनी अध्यात्माला राष्ट्रवादाची जोड दिली. 'दासबोध' हा त्यांचा ग्रंथ म्हणजे व्यवस्थापनशास्त्राचा, नीतिशास्त्राचा आणि अध्यात्माचा समन्वय आहे. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' ही शिकवण देत त्यांनी समाजाला बलोपासना आणि स्वत्वाची जाणीव करून दिली. 'आधी केले मग सांगितले' या बाण्याने त्यांनी स्वतः घळीत राहून, संघटन बांधून शिवाजी महाराजांना मार्गदर्शन केले. मनाचे श्लोक आजही मनाला उभारी देतात.

महिला संतांनीही या साहित्यात मोलाची भर घातली. मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग, जनाबाईचे 'डेरा बैल आला', 'विटेवरी उभा' हे भावपूर्ण अभंग, बहिणाबाईंचे विरक्तीपर अभंग आणि कान्होपात्रेची 'नको देवराया अंत आता पाहू' ही आर्त हाक, या साऱ्यांतून स्त्रीच्या वेदनेबरोबरच तिच्या आत्मबलाचेही दर्शन घडते. सोयराबाई, निर्मळा या संतांनीही आपल्या रचनांतून सामाजिक विषमतेवर भाष्य केले.

अठराव्या-एकोणिसाव्या शतकात समर्थ संप्रदाय, मध्व संप्रदाय, दत्त संप्रदाय यांनी अध्यात्म साहित्याची धारा वाहती ठेवली. श्रीधर स्वामींची 'हरिविजय', 'रामविजय', 'पांडवप्रताप' ही चरित्र-काव्ये लोकप्रिय झाली. मोरोपंतांच्या 'केकावली' आणि आर्यांनी पौराणिक कथा रसाळ भाषेत आणल्या. पुढे महात्मा फुल्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' लिहून, तर गाडगे महाराजांनी कीर्तनातून समाजप्रबोधन केले. आधुनिक काळात विनोबा भावेंची 'गीताई', साने गुरुजींचे 'भारतीय संस्कृती'वरील लेखन, पांडुरंगशास्त्री आठवलेंचे 'स्वाध्याय' साहित्य यांनी अध्यात्माला नवे आयाम दिले.

महाराष्ट्रातील अध्यात्म साहित्याची काही वैशिष्ट्ये ठळकपणे जाणवतात. पहिले, हे साहित्य संस्कृतच्या जोखडातून मराठीला मुक्त करणारे ठरले. दुसरे, याने 'पुरुषसूक्त' आणि 'मनुस्मृती'तील भेदभाव नाकारून 'एकचि धर्म जगाला, प्रेम अर्पावे' हा मंत्र दिला. तिसरे, यातील संतांनी 'क्रिया करूनि सांगणे' यावर भर दिला. त्यांनी स्वतः कष्ट केले, अन्याय सहन केला, पण तत्त्वाशी तडजोड केली नाही. चौथे, हे साहित्य केवळ बोधपर नाही, तर अत्यंत कलात्मक आहे. ओवी, अभंग, गौळण, भारूड, वासुदेव, श्लोक, आर्या, साकी असे विविध काव्यप्रकार इथे फुलले. पाचवे, याने 'भक्ती' आणि 'शक्ती' यांची सांगड घातली. तुकारामांची भक्ती आणि रामदासांची शक्ती, या दोन्ही महाराष्ट्राच्या दोन भुजा आहेत.

आज जागतिकीकरणाच्या काळात माणूस अधिक एकटा, अस्वस्थ आणि दिशाहीन होत आहे. अशावेळी महाराष्ट्रातील संत साहित्य पुन्हा वाचण्याची, समजून घेण्याची गरज आहे. कारण ते 'तेलवात दिवा, माणूस खरा देवा' सांगते. ते 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी' म्हणत सृष्टीशी नाते जोडते. ते 'युद्ध नको, बुद्ध हवा' हा संदेश देते. ज्ञानेश्वरांची विश्वप्रार्थना, तुकारामांची करुणा, रामदासांचे सामर्थ्य आणि गाडगेबाबांची स्वच्छता, ही चतुःसूत्रीच आजच्या समाजाला तारू शकते.

थोडक्यात महाराष्ट्राचे अध्यात्म साहित्य म्हणजे केवळ पोथ्या-पुराणे नव्हेत तर एक विचार आणि जगण्याची सुंदर पद्धत आहे. 'ग्रंथ हेच तीर्थ' मानणाऱ्या परंपरेने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलला आहे. (साभार इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### वायफाय राउटरने शरीरात काय बदल होतो?



हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील कन्सल्टंट फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले की, एका आठवड्यासाठी रात्री वायफाय राउटर बंद केल्याने व्यक्तींमध्ये शारीरिक बदल होण्याची शक्यता फारच कमी आहे.

वायफाय उपकरणे लो लेव्हल, नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात, जे वैज्ञानिक एकमतानुसार दररोजच्या संपर्कासाठी सुरक्षित आहेत. पण, ज्या लोकांना इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड्स (EMFs) बद्दल संवेदनशीलता असल्याचे आढळले आहे त्यांच्यासाठी, हा बदल डोकेदुखी, झोपेचा त्रास किंवा मानसिक थकवा यासारख्या लक्षणांपासून आराम देऊ शकतो. असे असले तरीही इलेक्ट्रोमॅग्नेटिक अतिसंवेदनशीलतेचे समर्थन करणारे क्लिनिकल पुरावे अनिर्णित आहेत, असे डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले आहेत.

डॉक्टर सुधीर कुमार यांच्या मते, वाय-फाय राउटर २.४ GHz किंवा ५ GHz फ्रिक्वेन्सी बँडमध्ये नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात; जे खूप कमी-ऊर्जेचे ईएमएफ आहेत आणि जे मोबाईल फोन डोक्याजवळ धरल्यावर उत्सर्जित होणाऱ्या किरणांपेक्षा खूपच कमी आहेत. घरामध्ये १ ते २ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर असताना या EMFsची तीव्रता झपाट्याने कमी होते. त्यामुळे एक सामान्य वायफाय राउटर मेलाटोनिन या झोपेस मदत करणाऱ्या संप्रेरकाच्या निर्मितीवर परिणाम करतो किंवा पीनियल ग्रंथीचं (pineal gland) काम बिघडवतो, ही शक्यता खूपच कमी आहे. दुसरीकडे, ब्लू लाईट पाइनल ग्रंथीच्या कार्यात व्यत्यय आणून झोपेच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर प्रतिकूल परिणाम करतो

याव्यतिरिक्त, रात्रीच्या वेळी डिजिटल एंगेजमेंट कमी केल्याने मेलाटोनिनचे उत्पादन चांगले होऊ शकते, जे झोपण्याच्या आणि उठण्याच्या चक्राचे नियमन करण्यासाठी जबाबदार आहेत तसेच रात्री वायफाय बंद करण्याचा झोपेच्या गुणवत्तेवर अप्रत्यक्षपणे फायदे होतो. म्हणजेच वायफायचा वापर दीर्घकाळ स्क्रीन एक्सपोजरशी संबंधित असतो. त्यामुळे वायफाय बंद केल्याने रात्रीचा स्क्रीन वापर मर्यादित होऊ शकतो, शांत झोप लागण्यास मदत होऊ शकते.

# संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर



## निमित्त

मराठी पत्रकार, लेखक आणि वक्ते अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १८७९ रोजी सातारा जिल्ह्यातील वाई येथे झाला. त्यांचे वडील वामनराव कोल्हटकर हे एक वकील आणि नेमस्तपक्षीय सुधारक नेते होते. अच्युतरावांचे पालनपोषण त्यांचे चुलते बळवंतराव यांनी केल्यामुळे अच्युतराव त्यांचे नाव लावत.

अच्युत कोल्हटकर यांनी बीएएलएलबीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर सातारा आणि नागपूर येथे अनुक्रमे शिक्षक व वकील म्हणून काम केले. १९०७मध्ये देशसेवक या पत्राचे संपादक होऊन जहाल राष्ट्रवादी राजकारणात त्यांनी प्रवेश केला. त्याबरोबरच त्यांची अनेक चढउतारांनी भरलेली राजकीय आणि वृत्तपत्री कारकीर्द सुरू झाली. या कारकीर्दीत १९०८मध्ये लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा जहाल भाषेत पुरस्कार केल्याबद्दल आणि १९३०मध्ये गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना कारावास भोगावा लागला.

अच्युतरावांनी १९१५ साली काढलेल्या संदेश या पत्राने मराठी वृत्तपत्रसृष्टीचा गंभीर चेहरामोहराच बदलून टाकला. भावनेला आवाहन करणारे तसेच कल्पकतेने आणि विनोदाने प्रतिपक्षाची भंबेरी उडवून टाकणारे अग्रलेख, 'संदेशचा अहेर', 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'चहा, चिवडा, चिरूट', 'संदेश दरबारचा पदवीदान समारंभ' इ. चटकदार सदरे, चित्तवेधक बातम्या, आकर्षक मथळे यामुळे मराठी वृत्तपत्रीय लेखनात बहुरंगीपणा आला व ते जनसामान्यांपर्यंत पोहचले. त्यांनी चालू केलेल्या मेसेज (१९१७) या इंग्रजी वृत्तपत्राचा मात्र जम बसला नाही.

संदेश लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच सरकारी अवकृपेस बळी पडला. पुढे संजय, चाबूक, चाबूकस्वार ह्यांसारखी अनेक पत्रे त्यांनी काढली. पटवर्धन व तळजापूरकर यांच्या साहाय्याने श्रुतिबोध (१९१२) आणि उषा (१९१३) ही मासिके चालविली. सौ. वत्सलावहिनी यांचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेख (१९१५), चोरी कशी करावी? (१९२५), अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ (भाग १ ते ३, १९३३-३५) इ. पुस्तकांमधून त्यांचे निवडक लिखाण संकलित झालेले आहे.

स्वामी विवेकानंद (आवृत्ती दुसरी, १९१६), नारिंगी निशाण (१९१७) आणि संगीत मस्तानी (१९२६) यांसारखी नाटकेदेखील त्यांनी लिहिली. स्वतःची नाटक कंपनी काढून काही नाटकांतून भूमिका केल्या. काही कादंबऱ्या लिहिल्या. तथापि, 'संदेशकार' हीच त्यांची जनमानसात विशेष रूढ झालेली प्रतिमा होती.

लोकमान्य टिळकांवरील मृत्युलेख, 'मराठी काव्याची प्रभात', 'शेवटची वेल सुकली', 'दोन तात्या', 'पुणेरी जोडे', 'माधवाश्रमात शिवाजी' यांसारखे त्यांचे वेचक लेख वृत्तपत्रीय मराठी साहित्याची भूषणे होत. अशा या व्यक्तिमत्त्वाचे १५ जून १९३१ रोजी निधन झाले. त्यांचे नाव मुंबई-गिरगावातील एका रस्त्याला देण्यात आले आहे. आज ते जरी हयात नसले तरी त्यांचे कार्य आजही त्यांची आठवण करून देते.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पौष्टिकतेने परिपूर्ण अशा मक्याच्या कणसाचे फायदे

पावसाळा सुरू झाला आहे. या दिवसांत आपल्याला आजूबाजूला मक्याचे कणीस हातगाड्यांवर हमखास दिसते. मक्याचे कणीस खायला जेवढे चविष्ट आहे तेवढेच ते आरोग्यासाठीही फायदेशीर असते. मक्याच्या कणसात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन ई, मिनरल आणि अँटीऑक्सिडेंट्स पौष्टिक घटक असतात, जे आरोग्याच्या अनेक समस्या दूर करतात. यांसह कणसात फायबरसुद्धा असते. जे पचन सुधारण्यास आणि रक्तातील साखर कंट्रोलमध्ये ठेवण्यास उपयुक्त ठरते. याव्यतिरिक्तदेखील मक्याचे कणीस खाल्याने फायदे होतात, कोणते पाहुयात.



अनेक लोक घरातच मक्याचे कणीस भाजून खातात. काही लोक स्नॅक्स म्हणून कुरकरे खातात. त्यांच्यासाठी मक्याचे कणीस हा एक चांगला पर्याय होऊ शकतो, पण मक्याच्या कणासामध्ये हाय कॅलरी असतात.

मक्याचे कणीस, कॉर्न, मका याबाबत तुम्ही जर इंटरनेटवर सर्च केले तर अशा अनेक नव्या गोष्टी माहित होतील की, ज्यामुळे ते नुकसानकारक असल्याचे दिसते, पण जर हे मर्यादित प्रमाणात खाल्ले तर याचा मोठा फायदा होऊ शकतो.

**अशक्तपणाच्या तक्रारी दूर होतात** : अशक्तपणाची समस्या प्रामुख्याने महिलांमध्ये आणि लहान मुलांमध्ये दिसून येते. अशक्तपणाचे प्रमुख लक्षण म्हणजे थकवा जाणवणे. अशावेळी तुम्हाला कणीस खाणे फायद्याचे ठरते. यामुळे शरीरात लाल पेशी तयार होण्यास मदत मिळते, तसेच यातील पोषक घटकांमुळे रक्ताची कमतरतादेखील दूर होते.

**डोळे** : मक्याचे कणीस खाल्ल्याने डोळ्यांचे आरोग्य राखण्यास मदत होते. यातील व्हिटॅमिन ए आणि बीटा कॅरोटीनसारखे पोषक घटकांमुळे दृष्टी सुधारण्यास फायदेशीर ठरतात. जर तुम्ही मक्याचे कणीस रोज खाल्ले तर याने डोळ्यांशी संबंधित आजार होण्याचा धोका कमी होतो.

**कोलेस्ट्रॉल कमी करण्यास उपयुक्त** : कणसात फायबर भरपूर प्रमाणात असते. ज्यामुळे शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची लेव्हल कमी होण्यास मदत मिळते, तसेच तुम्ही रोज कणीस खाल्ले तर हृदयासंबंधित आजार दूर होण्याचा धोकाही कमी होतो.

**त्वचेसाठी फायदेशीर** : यात बीट कॅरोटिनचे प्रमाण जास्त असते. यामुळे डोळ्यांसह त्वचेचे आरोग्य राखतात. तसेच यातील अँटीऑक्सिडेंट्समुळे वृद्धत्वाच्या समस्येवर मात करण्यास मदत होते.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी एसटीचे एनसीएमसी स्मार्ट कार्ड

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे सवलतधारी प्रवाशांसाठी डिजिटल पद्धतीने सेवा देण्यात येत आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवाशानंतर आता शालेय विद्यार्थ्यांना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) हे स्मार्ट कार्ड देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. शाळा सोमवारपासून (दि. १५ जून) सुरू होणार आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थी पाससाठी नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यावेळी विद्यार्थ्यांना एनसीएमसी कार्डचे वितरण केले जाणार आहे.





राज्य परिवहन महामंडळाच्या विविध सवलतधारी व विनासवलतधारी प्रवाशांना आधुनिक प्रवासाची सुविधा देण्यासाठी मे. ईबिक्स टेक्नोलॉसिस लि. एनएसडीएल पेमेंट बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे 'एनसीएमसी कार्ड' प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पांतर्गत कार्ड नोंदणी वितरण प्रक्रिया एसटीच्या सर्व आगारांमध्ये सुरू आहे. शालेय शिक्षण (शैक्षणिक, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण) घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हे स्मार्टकार्ड मिळविण्यासाठी 'सरल' किंवा 'अपार' क्रमांक असणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांचा हा सरल किंवा 'अपार' क्रमांक आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

नोंदणी प्रक्रिया प्रमाणित केलेला अर्ज बसस्थानकावरील किंवा आगारातील वाहतूक नियंत्रक, अधिकृत एजंट यांच्याकडे सादर करावा लागेल. तेथे कागदपत्रांची पडताळणी करून विद्यार्थ्यांची 'एनसीएमसी' कार्ड नोंदणी केली जाईल.

शालेय विद्यार्थ्यांना मासिक पाससाठी लागणारा अर्ज एसटी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या अर्जातील माहिती व आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. तीस दिवसात मिळणार कार्ड नोंदणी करताना विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांचा मोबाइल क्रमांक देणे सक्तीचे आहे.पाससाठी निश्चित शुल्काची रक्कम भरल्यानंतर विद्यार्थ्यांना पावती दिली जाईल. नोंदणी झाल्यापासून ३० दिवसांच्या आत हे कार्ड प्रिंट होऊन संबंधित आगारात देण्यात येणार आहे. आगारात कार्ड आल्यानंतर तिथल्या 'पीओएस' मशीनद्वारे ते चालू करून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' साठी विद्यार्थ्यांना १९९ रुपये शुल्क भरावे लागणार आहे. हे प्रीपेड कार्ड असून, ते केवळ एसटी प्रवासापुरते मर्यादित नसून, देशभरातील मेट्रो, बेस्ट बस; तसेच काही रेल्वे सेवांमध्येही वापरता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शाळेतून तातडीने बोनाफाइड प्रमाणपत्र घेऊन नजीकच्या एसटी आगार किंवा अधिकृत एजंटकडे जाऊन नोंदणी पूर्ण करावी, असे एसटी महामंडळाने आवाहन केले आहे.

## पेणच्या ललित पाटील यांची आगरी समाज संस्थेवर बिनविरोध निवड

**पेण : प्रतिनिधी**



पेण नगरीतील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांचे कनिष्ठ पुत्र ललित पाटील यांची आगरी समाज संस्थेवर बिनविरोध निवड झाली आहे .त्यांच्या या निवडीबद्दल पूर्ण पेण तालुक्यात विशेष कौतुक केले जात आहे.

ललित पाटील यांचे आगरी समाजाच्या विकासासाठी योगदान मोठे आहे.स्पष्ट वक्तव्य व पारदर्शक कार्य हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण आहे.निवड झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की समाज संघटित करणे, त्याचा वैभव वाढवणे हा आपला धर्म आहे. जुने हेवेदावे विसरून जा. नव्याने कामाला लागू या समाजासाठी कधी कमी पडू देणार नाही त्यांचा सर्व तालुक्यात लौकिक आहे. सर्वधर्मसमभाव राखणारे, सातत्याने गोरगरिबांच्या मदतीला धावणारे असा त्यांचा परिचय आहे. त्यांच्या पत्नी सौ. प्रीतमताई पाटील पेण नगरीच्या नगराध्यक्ष असून पेण शहराच्या विकासात त्यांनी आपली मोलाची कामगिरी बजावत आहेत.


राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## प्रेक्षकांना पुन्हा हसवायला येतोय 'इपितर' फेम 'आर्थिंग्या'; गोल्डन एरा स्टुडिओजची नवी वेबसीरिज

**पाली : प्रतिनिधी**

मराठी प्रेक्षकांच्या मनात विशेष घर केलेल्या 'इपितर' या चित्रपटातील अत्यंत लोकप्रिय आणि लाडके पात्र 'आर्थिंग्या' आता नव्या वेबसीरिजच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात आर्थिंग्याची मुख्य भूमिका साकारणारे तसेच टाईमपास चित्रपटातील मलेरिया दादूस फेम अभिनेते जयेश चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही घोषणा केली असून, यामुळे त्यांच्या चाहत्यांना एक सुखद धक्का मिळाला आहे.

'इपितर' चित्रपटातील आर्थिंग्या या पात्राला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले होते. त्याची




निरागसता, खुसखुशीत संवादफेक आणि आगळीवेगळी विनोदशैली आजही प्रेक्षकांच्या चांगलीच स्मरणात आहे. आता हेच बहुचर्चित पात्र एका नव्या रंजक कथानकासह आणि नव्या स्वरूपात वेबसीरिजच्या माध्यमातून प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाले आहे. विशेष म्हणजे, हे मुख्य पात्र साकारणारे अभिनेते जयेश चव्हाण हे रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील रहिवासी असल्याने या निमित्ताने रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या नव्या आगामी वेबसीरिजची निर्मिती गोल्डन एरा स्टुडिओज (Golden Era Studioz) करत आहे. या भव्य प्रकल्पासाठी सध्या ऑनलाईन ऑडिशनलाही सुरुवात करण्यात आली आहे. या वेबसीरिजच्या माध्यमातून नवोदित तसेच अनुभवी स्थानिक कलाकारांना अभिनयाची मोठी संधी उपलब्ध करून दिली जात असून, इच्छुक कलाकारांकडून ऑडिशन मागविण्यात येत आहेत.

## देशासाठी निस्वार्थीपणे काम करणारी पिढी निर्माण करण्याची गरज –स्वामी भारतानंद सरस्वती

**खोपोली : प्रतिनिधी**

देशाला समर्पित भावनेने काम करणारी पिढी निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अ भा संत समितीचे महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती यांनी खोपोली येथे केले सकल हिंदू समाज लव्हेज विभागाच्या वतीने उदयविहार साईबाबा मंदिराच्या प्रांगणात विश्व हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते ,त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते, संघाचे सद्भाव सामाजिक कार्य संयोजक प्रसन्न गोडसे, श्रीकृष्ण मंदिर चे स्वामी रमेश, चिन्मय मिशन चे स्वामी मेघजानंद, नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोद जाधव होते. प्रारंभी गीत सादर करण्यात आले.

आपल्या भाषणात स्वामी भरतानंद यांनी प्रत्येक भारतीयांनी संविधानाचा आदर केलाच पाहिजे, हिंदू समाजात सुसंस्कृत व संस्कारित कार्यकर्ता निर्माण व्हावा यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एक तासाच्या शाखेत पाल्याला पाठवावे असा त्यांनी आग्रह धरला.

देशात विरोधी शक्ती निर्माण होत आहेत त्यांना रोखणे काळाची गरज असल्याचे पण त्यांनी सांगितले हिंदू समाजाने जातीभेद वर्णभेद याला तिलांजली देत सर्वांनी एकजुटीने देशासाठी समाजासाठी एकत्र येण्याची गरज आहे देशात स्वातंत्र्य फक्त चरख्याने मिळाले नाही तर अनेक तरुणांना फासावर जावे लागले स्वतंत्र प्राप्तीसाठी सगळ्यांचे योगदान आहे ते स्वातंत्र्य टिकविणे काळाची गरज असल्याचे पण त्यांनी सांगितले विशेष अतिथी गोडसे यांनी आपल्या भाषणात हिंदू संमेलन राष्ट्रीय स्वयं संघासाठी नव्हे तर साऱ्या विखुरलेल्या समाजासाठी आहे हिंदूंचे संघटन व्हावे ही यामागची भावना असल्याचे त्यांनी सांगितले बालपणापासून त्यांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करण्याचे काम संघाच्या शाखेत शिकविले जाते असेही त्यांनी शेवटी सांगितले राष्ट्रीय स्वयंसेवक संघची स्थापना व संघाची सेवा कार्य त्याची माहिती गोडसे यांनी विस्तृतपणे उपस्थित त्यांना दिली कार्यक्रमापूर्वी कार्यकर्त्यांनी मोटरसायकल रॅलीचे आयोजन केले होते त्याला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## मंत्री आदिती तटकरेंची म्हसळ्यात पक्षीनिरीक्षणासह निसर्गभ्रमंती

**माणगाव : बातमीदार**

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या व्यस्त शासकीय कामकाजातून वेळ काढत रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील निसर्गरम्य वनक्षेत्रात पक्षीनिरीक्षण आणि निसर्गभ्रमंतीचा आनंद घेतला. राजकारणातील जबाबदाऱ्या सांभाळताना निसर्ग, पर्यावरण आणि जैवविविधतेबद्दल असलेली त्यांची आस्था या भेटीतून प्रकर्षाने दिसून आली.

यावेळी त्यांच्यासमवेत प्रसिद्ध वन्यजीव अभ्यासक व छायाचित्रकार शंतनु कुवेसकर उपस्थित होते. निसर्गभ्रमंतीदरम्यान आदिती तटकरे यांनी परिसरातील जैवविविधतेची सखोल माहिती घेत विविध पक्ष्यांचे बारकाईने निरीक्षण केले.

विशेषतः रायगडच्या जंगलांचा अभिमान मानल्या जाणाऱ्या ग्रेट हॉर्नबिल



(महाधनेश) या दुर्मीळ पक्ष्याच्या अधिवास, जीवनचक्र, प्रजनन प्रक्रिया आणि पर्यावरणीय महत्त्वाविषयी त्यांनी उत्सुकतेने माहिती जाणून घेतली.

याशिवाय नवरंग, काळटोप हळद्या, पाचू कवडा, मधुबाज, शमा आणि गव्हाणी घुबड यांसारख्या विविध पक्ष्यांचे निरीक्षण करत त्यांनी त्यांच्या जीवनशैली व पर्यावरणातील भूमिकेची माहिती घेतली. या नयनरम्य क्षणांची छायाचित्रे टिपत त्यांनी निसर्गाच्या सान्निध्यातील अविस्मरणीय अनुभवाचा आनंद लुटला.

निसर्गभ्रमंतीनंतर सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास परतत असताना आदिती तटकरे यांनी माणगाव तालुक्यातील उतेखोल येथील कुवेसकर कुटुंबीयांच्या निवासस्थानी अनपेक्षित सदिच्छा भेट दिली. भारतीय संस्कृतीतील 'अतिथी देवो भव' या परंपरेनुसार कुवेसकर परिवारातर्फे त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी आयोजित चहापान कार्यक्रमात कुवेसकर आजींनी प्रेमाने तयार केलेल्या मसाला ब्लॅक टीचा आस्वाद घेत मंत्री तटकरे यांनी कुटुंबीयांशी मनमोकळा संवाद साधला. बालपणीच्या आठवणी, आजोळातील रम्य दिवस, निसर्गाच्या सान्निध्यात घालवलेले क्षण, पशु–पक्ष्यांचा सहवास, गोठ्यातील गाई–वासरांचे हंबरणे आणि ग्रामीण जीवनातील आत्मीयता याविषयी त्यांनी आपुलकीने आठवणी जागवल्या.

यावेळी त्यांनी निसर्ग, अध्यात्म आणि मानव यांच्यातील अतूट नात्यावरही भाष्य केले. "निसर्गाशी जुळलेले नाते मनाला समाधान, मानसिक शांतता आणि अंतर्मनाला ईश्वराशी जोडणारी सकारात्मक अनुभूती देते," असे मत व्यक्त करत पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि निसर्गाशी सुसंवाद राखण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

राजकीय वारसा लाभला असला तरी स्वकर्तृत्व, सामाजिक बांधिलकी आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाच्या जोरावर स्वतःचे वेगळे नेतृत्व निर्माण करणाऱ्या आदिती तटकरे यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदनशीलता, निसर्गप्रेम आणि अध्यात्मिक विचारांचा अनुभव या भेटीदरम्यान घेण्याची संधी लाभल्याची भावना कुवेसकर कुटुंबीयांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्री पंचायतराज अभियानात महागाव ग्रामपंचायत जिल्ह्यात दुसरी


**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पंचायत राज विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियान २०२५–२६ मध्ये रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महागावने अत्यंत मानाचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे संपूर्ण परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ही कामगिरी सर्व ग्रामस्थांसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात राबवण्यात आलेल्या विविध लोककल्याणकारी योजना, पारदर्शक कारभार, स्वच्छता मोहीम आणि पायाभूत सुविधांचा विकास या सर्व आघाड्यांवर महागाव ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी केली. मुख्यमंत्र्यांच्या या विशेष अभियानात ग्रामपंचायतीला मिळालेले हे यश म्हणजे गावातील लोकसहभाग आणि उत्कृष्ट नियोजनाचे फलित मानले जात आहे. ग्रामपंचायत महागावने मिळवलेल्या या ऐतिहासिक यशामध्ये गावाचे सरपंच, सर्व सन्माननीय सदस्य, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावातील प्रत्येक नागरिकाचे मोलाचे योगदान लाभले आहे. अभियानादरम्यान या सर्वांनी घेतलेल्या विशेष परिश्रमांमुळेच गावाला हा बहुमान प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते गणेश चोरगे यांनी ग्रामसेवक, सरपंच, सर्व सदस्य, कर्मचारी आणि समस्त महागाव ग्रामस्थांचे मनापासून हार्दिक अभिनंदन केले आहे.

जिल्हा परिषद अलिबाग–रायगड यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने हे सन्मानपत्र देऊन ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला आहे. महागाव ग्रामपंचायतीचा हा आदर्श इतर गावांनाही प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात असून ग्रामपंचायतीच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी आणि भावी उपक्रमांसाठी सर्व स्तरांतून हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# श्रीवर्धन, म्हसळा, बोर्ली अन् दिघी बसस्थानक परिसरात 'नो पार्किंग' विरोधात जनजागृती



**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

एसटी बस स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी एसटी प्रशासनाने कंबर कसली आहे. राज्याचे परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार, तसेच उप महानिरीक्षक तथा मुख्यसुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियांका नारनवरे यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीवर्धन आगारासह दिघी, बोर्ली आणि म्हसळा बसस्थानक परिसरात 'नो पार्किंग'चे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाईची संकेत देत नुकतीच विशेष मोहीम राबविण्यात आली.

बस स्थानक परिसरापासून २०० मीटरच्या अंतरात अनधिकृतपणे पार्क केलेल्या वाहनांमुळे एसटी बसेसना ये–जा करण्यास अडथळा निर्माण होत होता. या बाबत संबंधीत वाहन मालकाना समज देवून जन जागृती करण्यांत आली. या विशेष मोहीमेवर सुरक्षा व वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने ही मोहीम राबविली. भविष्यांत या मोहीमेच्या माध्यमांतून बस स्थानकाच्या परिसरांत मोठ्या प्रमाणांत जनजागृती करण्यात येणार आहे या मोहिमेत परिवहन मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून खाजगी वाहन धारकाना समज दिली.यामध्ये प्रणव कुमार पाटील (सुरक्षा व दक्षता अधिकारी, पेण),बाजीराव कदम (राखण व पहारा निरीक्षक),मेहबूब मनेर (आगार व्यवस्थापक, श्रीवर्धन)उदय मोरे (वाहतूक नियंत्रक)राजेंद्र पुरारकर (वाहतूक नियंत्रक, म्हसळा)या सर्व अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक सक्रीय होते.

बस स्थानक परिसर हा प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. २०० मीटर परिसरात नो–पार्किंगच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ही मोहीम यापुढेही अशीच सुरू राहणार असून वाहनचालकांनी सहकार्य करावे," असा इशारा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिला आहे.



## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खाली तक्त्यात नमुद केलेली बिनशेती जमिन मिळकत माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक अथर्व सुब्रामानैम, अनुराग वेंकटेश गोडबोले आणि अभिषेक पद्मनाभ गोडबोले यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र आर.चौ.मी.चौ.से.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४/ब/१५ (प्लॉट नं. ५ अ + ५ ब) (सब प्लॉट नं. १ ते ५) | ४३.५०,०० | ४३५.०० |

याप्रमाणे वर नमुद मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गव्हाण, दान बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **१५ (पंधरा)** दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीविक्रीकरार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक : १५/०६/२०२६**

**सही/–**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**

कार्यालयीन पत्ता :– गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपीग कॉम्पेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल नं. ८०९७३९९३३१
ई मेल आय.डी. – dsk८४०@gmail.com

## जाहिर नोटिस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या रजिस्टर्ड नोंद केलेले दस्तऐवजाचे मूळ कागदपत्रे (ओरीजीनल दस्तऐवज) कोठेतरी नजर चुकीने, अनावधानाने विसरलेला असून काळजीपूर्वक शोध घेऊन सुद्धा मिळत नसल्यामुळे दस्तऐवजाचे मालक ही जाहीरात देत आहेत.

मूळ मालक / तक्रारदार : श्री. अरविंद लक्ष्मणराव रामरामे

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्रमांक १०१, पहिला माळा, रॉयल गॅलॅक्सी प्लॉट क्रमांक – १८०, सेक्टर– १०, कोपरा –खारघर, ता. पनवेल, जिल्हा – रायगड एकूण क्षेत्र अंदाजे ५६.०३४ चौ. मी. आहे.**

सदर मिळकतीचे मूळ कागदपत्रे हरविलेले असून त्या मूळ कागदपत्रासोबत खालील कागदपत्रे सुध्दा हरविलेले आहेत.

१) ॲग्रीमेंट फॉर सेल दिनांक २६/१०/२०१०
२) दस्त नोंदणी क्रमांक : १०५७६/२०१०/पवल–३ दि. २६/१०/२०१०.
३) सूची–II –१०५७६/२०१०.
४) असेसमेंट लेटर दिनांक १८/०३/२००९.
५) डेव्हलपमेंट (विकसन) परवानगी पत्र– १८/०३) २००९.
६) बिल्डरला देण्यात आलेल्या अनामत / अगाऊ रकमेची पावती ज्या चेकद्वारे अदा केली त्याचा क्रमांक ६१४९४४ (614944) दिनांक १२/०९/२०१० आणि इतर संबंधीत कागदपत्रे
७) शेअर सर्टिफीकेट प्रत्येकी रुपये ५०/– अनुक्रमांक ००१ पासून ०१० पर्यंत.

सदर हस्तऐवज हरविले संबधी पनवेल शहर पोलीस स्टेशन मध्ये अनुक्रमांक ९३३/२०२६ दिनांक १९/०४/२०२६ रोजी तक्रार नोंदविलेली आहे.

ज्या कोणाला व्यक्तिला, बँकेला, वित्तपुरवठा करणारी संस्था, सोसायटी, विकासक, अधिकृत संस्था यांना आपला हक्क, ऑब्जेक्शन (विरोध), धारणाधिकार, अधिकार–टायटल इंटरेस्ट, किंवा पझेशन संबधीत मिळकतीविषयी अथवा संबंधित कागदपयाविषयी दावा हक्क प्रस्थापित करावयाचा असल्यास लिखित स्वरुपात योग्य त्या पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसांत खालील स्वाक्षरी करणार ॲड. भूषण उत्तमराव तायडे यांचेकडे सादर करावेत. अन्यथा सदर मिळकती संदर्भात/हरविलेल्या कागदपत्र याबाबत कोणाचाही हक्क नाही असे गृहित धरून मूळ मालक सदर मिळकतीच्या कागदपत्रा करीता तसेच नोंदणी झालेल्या दस्तऐवजाची दुय्यम प्रत प्राप्त करून आपला हक्क प्रस्थापित करतील याची कृपया संबधितांनी नोंद घेण्यात यावी. वेळेत सदर मिळकती संदर्भात उशिरा पोहोचलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. आणि कुणा ही इसमाला आपला हक्क दाखविता येणार नाही. तसेच सदर मिळकतीचे दस्तऐवज कुणाला प्राप्त झाले असल्यास खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**पनवेल–**
**दिनांक – १२/०६/२०२६**

**सही/–**
**ॲड. भूषण उत्तमराव तायडे**
**भाग्योदय ७९ नागिनदास मास्टर रोड, फोर्ट–मुंबई–४००००१**
**मो. ७७०९३३६२८०/९४२२३५९०९५**

# नमुंमपाच्या आरोग्यसेवेला बळ

## १०हून अधिक सुविधांचा आज शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य सेवा बळकटीकरणांतर्गत विविध आरोग्य सुविधांचे लोकार्पण व कामांचा शुभारंभ सोमवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वाशी सेक्टर १० येथील सार्वजनिक रुग्णालयात संपन्न होत आहे.

यावेळी ठाणे लोकसभा खासदार नरेश म्हस्के, कल्याण लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे व ज्ञानेश्वर म्हात्रे, बेलापूर विधानसभा आमदार मंदा म्हात्रे, कल्याण ग्रामीण विधानसभा सदस्य राजेश मोरे हे मान्यवर मुख्य अतिथी म्हणून तसेच उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त कैलास शिंदे, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, सभागृहनेते सागर नाईक, विरोधी पक्षनेते विजय चौगुले, परिवहन समिती सभापती विकास झंजाड हे मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध समित्यांचे सभापती सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांमध्ये या माध्यमातून भरीव वाढ करण्यात येत आहे. या आरोग्य सुविधांमध्ये नमुंमपा आणि गणेश नाईक यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून उभारण्यात आलेले स्वामी विवेकानंद भवन, सेक्टर १४, वाशी येथील डायलिसीस सेंटरचे लोकार्पण होत आहे. तसेच सार्वजनिक रुग्णालय, सेक्टर १०, वाशी येथे एमआरआय सेंटर लोकार्पण, मध्यवर्ती निर्जंतुकीकरण विभाग (सीएसएसडी) कार्यान्वित करणे, रुग्णालय बेड्स उपलब्धता डॅशबोर्ड कार्यान्वित करणे, वाशी आणि ऐरोली येथे हृदयविकार उपचार केंद्र (कॅथलॅब) कामाचा शुभारंभ, मिल्क बँक सुविधा लोकार्पण, मॉड्युलर मॉर्च्युरी (शवागृह) कार्यान्वित करणे आदी सुविधा त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, सेक्टर ८, सीबीडी बेलापूर येथील डायलिसीस सेंटर लोकार्पण आणि सेक्टर २४, जुईनगर येथील पशुवैद्यकीय रुग्णालय लोकार्पण तसेच महापे येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र लोकार्पण आदी विविध आरोग्य सुविधांचा समावेश आहे.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक जयाजी नाथ आणि उपसभापती गणेश सकपाळ तसेच सर्व समिती सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या सुशासनाचा आढावा

## वाशीत विकसित भारत संकल्प संमेलन उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील जनसेवा, सुशासन आणि विकासाच्या प्रवासाला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त वाशी येथील आर्य समाज हॉलमध्ये 'विकसित भारत संकल्प संमेलन' मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा आमदार योगेश सागर उपस्थित होते. यावेळी या संकल्प संमेलनात नवी मुंबईतील प्रतिष्ठित डॉक्टर, वकील, अभियंते, आर्किटेक्ट, उद्योजक, व्यापारी, चार्टर्ड अकाउंटंट, बँकर्स तसेच विविध कंपन्यांचे सीईओ आणि मॅनेजर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार योगेश सागर यांनी 'विकसित भारत' संकल्पनेवर सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्र सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजना, आत्मनिर्भर भारताच्या दिशेने देशाने उचललेली महत्त्वपूर्ण पावले, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेले महत्त्वाकांक्षी उपक्रम तसेच आगामी काळातील भारताच्या विकासाचा रोडमॅप यावर त्यांनी विस्तृत प्रकाश टाकला. यावेळी महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, सभागृह नेते सागर नाईक, माजी महापौर सुषमा दंडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# सानपाडा स्टेशन परिसर फेरीवाल्यांच्या विळख्यात

## अतिक्रमण हटवण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ शहराच्या प्रतिमेला सानपाडा रेल्वे स्टेशन परिसरातील वाढत्या फेरीवाला अतिक्रमणामुळे तडा जात असल्याचा आरोप करीत अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्याकडे सानपाडा परिसर फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्त करण्याची मागणी केली आहे.

नवी मुंबई शहराला स्वच्छता सर्वेक्षणामध्ये देश आणि राज्य पातळीवर विविध पुरस्कार मिळत असले तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये अतिक्रमण आणि अस्वच्छतेची समस्या कायम असल्याचे आमले यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. विशेषतः सानपाडा रेल्वे स्टेशनच्या दोन्ही बाजूंना आणि स्टेशनबाहेरील चौक, बधाई स्वीट्स परिसर, डायमंड डेअरी चौक तसेच अंतर्गत आणि बाह्य रस्त्यांवरील पदपथांवर वर्षभर फेरीवाल्यांचे अतिक्रमण असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. फेरीवाल्यांमुळे नागरिकांना पदपथांवरून चालणेदेखील कठीण झाले असून वाहतूक कोंडी आणि अस्वच्छतेच्या समस्याही आता वाढताना दिसत आहेत.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून सदर प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. सानपाडा परिसरातील वाढता बकालपणा लक्षात घेता रेल्वे स्टेशन परिसरापासून संपूर्ण नोडमधील अंतर्गत आणि बाह्य रस्त्यांवरील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात यावेत, अशी मागणी आमले यांनी केली आहे.

# पाणथळ जागा म्हणजे हवामान विमा : वेटलँड्सच्या ऱ्हासावर 'नॅटकनेक्ट'चा इशारा

**नवी मुंबई : बातमीदार**

वेटलँड्स हे एमएमआरचे हवामान विमा कवच आहे आणि आपण ते स्वतःच्या विनाशाच्या दिशेने नष्ट करत आहोत, या तीव्र इशाऱ्याने जनरेशन झेडच्या तरुणांच्या मनाला स्पर्श केला आहे. डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ पब्लिक हेल्थमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी "प्लॅनेट इन प्रॅक्टिस २०२६" या समर इमर्शन कार्यक्रमादरम्यान मुंबई महानगर प्रदेशातील वेटलँड्स आणि फ्लेमिंगो अधिवासांच्या झपाट्याने होत असलेल्या ऱ्हासाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली.



ही प्रतिक्रिया नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी बुधवारी (दि. १०) नेरुळ येथील स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये घेतलेल्या संवादात्मक सत्रानंतर उमटली. कुमार यांनी इशारा दिला की, दलदली, चिखलपट्ट्या, खारफुटी आणि वेटलँड्सचा होत असलेला विनाश हा पूर, हवामानातील धक्के आणि वाढते तापमान यांच्याविरुद्ध असलेल्या प्रदेशाच्या नैसर्गिक संरक्षण व्यवस्थेलाच कमकुवत करत आहे. कुमार यांनी निदर्शनास आणले की एमएमआरमधील वेटलँड्सचा ऱ्हास आता स्थानिक समस्येपुरता मर्यादित राहिलेला नाही. नवी मुंबई, उरण, ठाणे खाडी आणि इतर किनारी भागांतील पाणथळ क्षेत्रांवर भराव, बांधकामे, प्रदूषण आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांचा वाढता दबाव आहे. परिणामी फ्लेमिंगो अधिवास, चिखलपट्ट्या, खारफुटी आणि नैसर्गिक जलप्रवाह धोक्यात आले असून हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हा पर्यावरणीय धोका अधिक गंभीर बनत आहे.

शैक्षणिक सादरीकरण म्हणून सुरू झालेला हा उपक्रम गुरुवारी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीत आणि पर्यावरणीय ऱ्हास, शासकीय उत्तरदायित्व तसेच नागरिकांच्या सहभागावरील गंभीर चर्चेत परिवर्तित झाला. विद्यार्थ्यांनी नेरुळमधील एनआरआय आणि डीपीएस फ्लेमिंगो तलावांना भेट दिली. तेथे त्यांनी पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळे, अधिवासांचे नुकसान आणि परिसंस्थेसमोरील विविध आव्हाने प्रत्यक्ष पाहिली. वैज्ञानिक इशारे, पर्यावरणीय नियम आणि न्यायालयीन हस्तक्षेप असूनही वेटलँड्स का नष्ट होत आहेत, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. कुमार यांनी स्पष्ट केले की, वेटलँड्स अतिरिक्त पावसाचे पाणी शोषून घेऊन पूरनियंत्रण करतात, वादळी भरतीचा प्रभाव कमी करतात, किनारी धूप रोखतात आणि भूजल पुनर्भरणास मदत करतात. या परिसंस्था काँक्रीटने बदलल्या जात असल्याने एमएमआरमधील शहरी पूरधोका वाढत असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

या सादरीकरणात नवी मुंबई, ठाणे खाडी आणि उरणमधील खारफुटी, चिखलपट्ट्या आणि फ्लेमिंगो अधिवासांचे पर्यावरणीय महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित जलपक्षी शैवाल व जलचर जीवांवर नियंत्रण ठेवून तसेच पोषकतत्त्वांच्या नैसर्गिक चक्रात योगदान देऊन वेटलँड्सचे आरोग्य टिकवून ठेवतात, असे कुमार यांनी सांगितले. "या सत्रातून आम्हाला वेटलँड्सना 'हवामान विमा' का म्हटले जाते हे समजले. तलावांमधील पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात होत असलेला अडथळा पाहून धक्का बसला आणि संवर्धनाची गरज अधिक तीव्रतेने जाणवली," असे रुतुराज रायते यांनी सांगितले. "महत्त्वाचे पाण्याचे प्रवाह किती सहजपणे विस्कळीत होऊ शकतात, ही बाब सर्वाधिक चिंताजनक वाटली. हवामान बदलाबाबत आपण वर्गात चर्चा करतो; पण येथे त्याचे परिणाम प्रत्यक्ष पाहायला मिळाले," असे सईश शेट्टी म्हणाले.

"ही भेट झाल्यानंतर वेटलँड्सकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. ही रिकामी जमीन नसून शहरांचे संरक्षण करणाऱ्या, जैवविविधतेला आधार देणाऱ्या, पूर रोखण्यास मदत करणाऱ्या सजीव परिसंस्था आहेत," असे सांदली कांबळे यांनी सांगितले. "संवर्धन व जनजागृती मोहिमांत योगदान द्यायचे आहे. तरुणांनी उपाययोजनेचा भाग बनले पाहिजे," असे वृषाली बोरहाडे यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी वेटलँड पुनर्स्थापनेसाठी योगदान कसे देता येईल याबाबत नॅटकनेक्टकडे मार्गदर्शन मागितले. काहींनी स्वच्छता मोहिमेत स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याची तयारी दर्शविली. यावर कुमार यांनी खारफुटी कक्ष व इतर संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून समुदायाच्या सहभागासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. समन्वयक भाग्यलक्ष्मी कालिदास, स्वाती बागल आणि वास्तुविशारद सागरिका कुमार यांनीही समुदायाधारित संवर्धन उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची तयारी दर्शविली.

# नवी मुंबईतील रेल्वे स्टेशनवर पालिकेमार्फत सखोल स्वच्छता मोहीम

## दीड टन कचरा प्रकल्पस्थळी नेला वाहून



**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ५ ते १२ जूनदरम्यान नवी मुंबईत ठिकठिकाणी राबविण्यात येणाऱ्या विशेष स्वच्छता मोहिमांतर्गत ६ व ७ जून रोजी तुर्भे, घणसोली, वाशी, नेरूळ, दिघा, रबाळे रेल्वे स्टेशन आणि दोन्ही बाजूच्या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणानुसार, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून संबंधित स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षकांसह १२५ हून अधिक स्वच्छताकर्मींसह रेल्वे स्टेशनवरील सखोल स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या.

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या सुपरस्वच्छ लीगमध्ये समाविष्ट शहर म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहरातील दैनंदिन स्वच्छतेकडे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत विशेष लक्ष पुरविण्यात येत आहे. यादृष्टीने शहरातील सार्वजनिक जागा, वर्दळीची ठिकाणे येथे सातत्याने विशेष स्वच्छता मोहिमांचे आयोजन करण्यात येत असते. वर्दळीच्या जागांमध्ये नवी मुंबईतील रेल्वे स्टेशन व परिसर हा अत्यंत महत्त्वाचा भाग असून तेथील स्वच्छता सिडको प्राधिकरणामार्फत पाहिली जाते, तथापि त्या ठिकाणी गुणवत्तापूर्ण स्वच्छता राखली जात नसल्याने नवी मुंबई शहराच्या स्वच्छता मानांकनावर दृश्य परिणाम होत असून नवी मुंबई पालिकेच्या वतीने रेल्वे स्टेशन व परिसर स्वच्छतेच्या मोहिमा राबविण्यात येत असतात.

१.५ टन कचरा गोळा करून तो तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

# धोरणनिर्मितीसाठी सांख्यिकी अभ्यासक्रमाचा भक्कम पाया

## कोकण, पुणे विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत असलेल्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाद्वारे राज्यामध्ये प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्यमांचे वार्षिक सर्वेक्षण या अत्यंत महत्त्वपूर्ण मोहिमेचा पाया घालणारी विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे नुकतीच यशस्वीरीत्या संपन्न झाली.

कोकण व पुणे विभागातील क्षेत्रीय कामासाठी नियुक्त केलेल्या अन्वेषक व पर्यवेक्षकांसाठी ५ ते १० जून या कालावधीत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याचे उद्घाटन अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबईच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांच्या हस्ते झाले. एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत चालणाऱ्या या संपूर्ण सर्वेक्षणांतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण सहा हजार ८२८ नमुना घटकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून हे काम २७६ अन्वेषक व निरीक्षकांमार्फत पूर्ण केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने कोकण व पुणे विभागाचा विचार करता शहरी आणि ग्रामीण भाग मिळून एकूण दोन हजार ९५६ नमुना घटकांचे सर्वेक्षण निश्चित करण्यात आले असून हे उद्दिष्ट ७५ अन्वेषक आणि २८ पर्यवेक्षकांच्या पथकाद्वारे पूर्ण केले जाईल.

या महत्त्वपूर्ण उद्घाटन प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी ऑनलाइन व्हिडिओ प्रणालीद्वारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की, या दोन्ही सर्वेक्षणांतून गोळा होणारी आकडेवारी ही ग्रामपातळी, जिल्हा आणि थेट विभागस्तरावरील विविध कल्याणकारी योजना व अचूक धोरण निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे. 'विकसित भारत @ २०४७' चे ध्येय साध्य करण्यासाठी आणि पुराव्यांवर आधारित डेटाचा उपयोग करून शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सोपे जावे यादृष्टीने हा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणजे सर्वेक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीची एक भक्कम पायाभरणी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, पुणे येथील सहसंचालक डॉ. रुही कुलकर्णी यांनी केले.

सेवानिवृत्त अतिरिक्त महासंचालक अशोक टोपराणी यांनी दोन्ही सांख्यिकी सर्वेक्षणांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी व आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांनी सांगितले की, 'विकसित भारत @ २०४७' नुसार जिल्हा विकासाचे मुख्य केंद्र बनले. त्यामुळे जिल्हास्तरीय रोजगार-बेरोजगार आकडेवारी, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची अचूक संख्या व रोजगार निर्मितीसारख्या निर्देशकांची सांख्यिकीय माहिती याद्वारे उपलब्ध होईल, जी राज्य व जिल्ह्याचा उत्पन्नाचा अंदाज तयार करण्यास व शासनाच्या विविध योजना आखण्यास उपयुक्त ठरेल. निवासी प्रशिक्षणादरम्यान 'Ipsos Research Pvt. Ltd. Mumbai' या बाह्यसंस्थेकडून नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांना रोजगाराची रचना, कामगार सहभाग दर, असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे स्वरूप, उत्पन्न व खर्च यांसारख्या तांत्रिक संकल्पनांचे सखोल ज्ञान देण्यात आले.

तसेच 'CAPI' तंत्रज्ञानाचा वापर करून 'Tablet' वर थेट माहितीची अचूक नोंदणी कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण सोहळ्याच्या व्यासपीठावर मुख्य कार्यालयाचे सहआयुक्त भीष्म बिरादार, विभागीय आयुक्त कार्यालय पुणेचे सहआयुक्त संजय मरकळे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उपआयुक्त प्रियांका बोकील आणि इप्सॉस संस्थेच्या संचालक तृप्ती शर्मा उपस्थित होते.

# नगररचना विभागाच्या परीक्षेला मुदतवाढ देण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील स्थापत्य अभियंता संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नगररचना विभागातील पदस्थापना व बदली नियुक्तीसाठी आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र कर्मचारी संघटनेच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. याबाबत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवींद्र सावंत यांनी निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले की, पात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी परीक्षा घेण्याचा प्रशासनाचा उद्देश स्वागतार्ह असला तरी सध्या पावसाळी हंगामामुळे अभियंता संवर्गावर विविध कामांचा ताण आहे. आपत्ती व्यवस्थापन, जलनिस्सारण व्यवस्था, रस्ते दुरुस्ती, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण, इतर अत्यावश्यक नागरी सेवांमुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी वेळ मिळत नाही.

तसेच परीक्षा अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आणि प्रत्यक्ष परीक्षा यामधील कालावधी अत्यंत कमी ठेवण्यात आल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुरेसा कालावधी उपलब्ध करून दिल्यास अधिकाधिक अधिकारी व कर्मचारी परीक्षेत सहभागी होतील आणि गुणवत्तापूर्ण स्पर्धेला चालना मिळेल, असे संघटनेचे म्हणणे आहे.

# वाशीत आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने महाआरोग्य शिबिर

## ३५८ नागरिकांनी घेतला लाभ



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे व श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था, गौरव सेवा ट्रस्ट व शिवसेवा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी सेक्टर-१६ येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराला ३५८ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

लॉयन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स, मयुरेश हॉस्पिटल, श्री रामकृष्ण नेत्रालय, डी.वाय. पाटील आयुर्वेदिक हॉस्पिटल व हेअरजप वाशी यांच्या सहकार्याने सदर मोफत महाआरोग्य शिबिर यशस्वी झाले. यावेळी मोफत आरोग्य तपासणी, रक्तदाब, डायबिटीस, बीएमआय, ईसीजी, डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला तसेच मोफत औषधे, डाबर च्यवनप्राश व मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन सलग ३० वर्षांपासून करीत आहे. जनतेची व वयोवृद्ध नागरिकांची सेवा करण्यास मला संधी मिळत असून हे कार्य मी अखंड पुढे सुरूच ठेवणार आहे. हवामानातील बदलांमुळे व येणाऱ्या पावसाळ्यामध्ये सर्दी, ताप, खोकला अशा अनेक विविध प्रकारच्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे म्हणून मोफत महाआरोग्य शिबिराची संकल्पना आपण वाशी शहरातील प्रत्येक विभागात नागरिकांसाठी उपलब्ध करणार आहोत, असे त्यांनी सांगितले.



**पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण मंडळ सरचिटणीसपदी किरण माळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पंचायत समिती सदस्य मयुर शेलार आदी उपस्थित होते.**

# पावसाच्या विलंबामुळे शेतकरी, बागायतदारांसह नागरिक हवालदिल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मान्सूनच्या आगमनास विलंब होत असल्याने रेवदंडा पंचक्रोशीतील शेतकरी, बागायतदार आणि सर्वसामान्य ग्रामस्थ चिंतेत सापडले आहेत. जून महिन्याचा मध्य उलटत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने परिसरात पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र झाली आहे. विहिरी, बोअरवेल आणि पाणवठ्यांची पातळी घटल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

शेतकरी शेतीची पूर्वतयारी पूर्ण करून पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. भात लागवडीसाठी शेतांची मशागत, बांधबंदिस्ती आणि अन्य कामे पूर्ण झाली असली तरी पावसाअभावी पेरणी व लागवडीची कामे रखडली आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास भात उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

तीव्र उष्णतेमुळे बागायतदारही चिंताग्रस्त झाले आहेत. आंबा, नारळ, सुपारी तसेच इतर फळबागांवरील झाडांना पाण्याअभावी ताण जाणवत असून अतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी खर्च वाढला आहे. सततच्या उकाड्यामुळे नव्या लागवडींनाही फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

रेवदंडा पंचक्रोशीसह मुरूड तालुक्यातील साळाव, कोर्लई, बोर्ली, मांडळा, शिरगाव, मिठेखार, वळके, चोरढा तसेच अलिबाग तालुक्यातील रेवदंडा, थेरोंडा, चौल, नागाव, वावे, खानाव, रामराज, वळवळी, चिचोंटी, सुडकोळी आदी भागांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. अनेक विहिरी आणि जलस्रोत कोरडे पडण्याच्या मार्गावर असून ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे.

विशेषतः महिलांना दुरून पाणी आणावे लागत असून अनेक ठिकाणी पाण्याच्या नळांभोवती सकाळ-संध्याकाळ लांबच लांब रांगा लागलेल्या दिसत आहेत. काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी वाढली असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

हवामान खात्याने मान्सून लवकरच सक्रिय होण्याची शक्यता वर्तवली असली तरी प्रत्यक्षात दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास शेती, बागायती आणि पिण्याच्या पाण्याचे संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.





**पेण : विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर आमदार अनिकेत तटकरे यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेत आशीर्वाद प्राप्त केले. यावेळी जि.प.चे सभापती वैकुंठ पाटील, ललित पाटील यांचीही भेट झाली तसेच निवृत्ती पाटील व जितेंद्र ठाकूर यांनीही भेटून अभिनंदन केले. ज्येष्ठांचे मार्गदर्शन, सहकार्य आणि आशीर्वाद हेच जनसेवेच्या प्रवासातील खरे बळ असून या आत्मीय भेटीमुळे अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली, असे आमदार अनिकेत तटकरे यांनी यावेळी सांगितले.**

# गरीब विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाला मदत करणे सर्वांचे कर्तव्य -नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**




गरीब व अनाथ विद्यार्थी शिकत असलेल्या वस्तीग्रह दानशूर व्यक्तींनी सढळहस्ते मदत करावी असे आवाहन खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी केले.बहुउद्देशीय महिला संस्था, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृह, व स्वामिनी प्रतिष्ठान संचलित वसतीगृहाचे वर्धापन दिना सोहळा च्या निमित्ताने नगराध्यक्ष शेंडे बोलत होते, यावेळी व्यासपीठावर जेष्ठ नेते उल्हासराव देशमुख, शिवसेना शहर अध्यक्ष तात्या रिठ, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे, माझी उपनगराध्यक्ष मोहन अवसरामल, त्याचप्रमाणे नगरसेवक नगरसेविका व मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर प्रास्ताविक सादर करण्यात आले. वस्तीग्रहातून काही विद्यार्थी उच्च पदावर गेल्याचे सांगण्यात आले. यावेळी उल्हासराव देशमुख, माजी सरपंच मनोरमा साळवी, स्वामिनी प्रतिष्ठानच्या कांचन जाधव, यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी केले. संस्थेच्या नाम फलकाचे उद्घाटन उलदीपक शेंडे यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत केले.

# मुरूडमध्ये प्राणी नियंत्रण केंद्र कार्यान्वित; भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय

**मुरूड : प्रतिनिधी**





मुरूड शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. लोकांच्या अंगावर हल्ला करणारे कुत्रे वाढले होते. अनेक पाखाडीत कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून ते नागरिकांच्या अंगावर येत आहेत व धोकादायक बनले आहेत. हा धोका नागरिकांच्या जीवावर बेतू नये याकरिता मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने मुरुड जंजिरा नगरपरिषदेमार्फत अलंकापुरी येथे अत्याधुनिक प्राणी नियंत्रण केंद्र कार्यान्वित केले आहे.

केंद्राच्या प्रभावी व व्यावसायिक व्यवस्थापनासाठी पुणे येथील नामांकित संस्था पेटफोर्स यांच्याशी करारनामा करण्यात आलेला आहे. या अंतर्गत शहरातील भटके कुत्रे मानवी पद्धतीने पकडून त्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात येणार असून, आवश्यक त्या वैद्यकीय उपचारांची सोय देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, सुमारे १०० कुत्र्यांसाठी सुसज्ज आश्रयगृह उभारण्यात आले असून त्यामध्ये स्वच्छता, अन्न-पाणी व आरोग्याची योग्य काळजी घेतली जाणार आहे. या उपक्रमामुळे कुत्र्यांची अनियंत्रित वाढ रोखणे, नागरिकांच्या सुरक्षेत वाढ करणे व प्राण्यांच्या कल्याणाचीही जपणूक करणे हे उद्दिष्ट साध्य होणार आहे.

मुरूड जंजिरा नगरपरिषद शहरातील नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेला प्राधान्य देत असून भटक्या प्राण्यांच्या समस्येवर परिणामकारक तोडगा काढण्यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. प्राणी नियंत्रण केंद्रात जास्तीत जास्त कुत्रे पकडून लोकांना दिलासा मिळणार आहे.

# नेत्रावती, मत्स्यगंधा एक्स्प्रेसचा प्रवास ठाणे स्टेशनवरच होणार समाप्त!

**रोहे : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक टर्मिनस येथे सुविधांच्या विस्तारासाठी मध्य रेल्वे रविवार (दि.१४) ते मंगळवार (दि. १६) या कालावधीत विशेष 'ब्लॉक' घेणार आहे. त्यामुळे तिरुवनंतपुरम-लोकमान्य टिळक टर्मिनस 'नेत्रावती एक्सप्रेस' गाडी क्र. १६३४६ आणि मंगळुरू सेंट्रल-लोकमान्य टिळक टर्मिनस 'मत्स्यगंधा एक्स्प्रेस' गाडी क्र. १२६२० या गाड्यांचा प्रवास ठाणे स्थानकावर शॉर्ट टर्मिनेट केला जाणार आहे.

या कामांमध्ये शंटिंग नेकचे बांधकाम, 'सिक साइडिंग'मध्ये बदल, देखभाल साइडिंग यार्ड, देखभाल साइडिंग क्र. ६, ७, ८ आणि ९ मधील 'पिट लाइन्स'चा विस्तार तसेच पाणीपुरवठा वाहिनी, ड्रेनेज आणि पावसाळी पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिनीचे मार्ग बदलणे यांसारख्या कामांचा समावेश आहे. हा ब्लॉक १४ जूनला सकाळी ८ वाजल्यापासून ते १६ जून रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत आहे. यामुळे गाडी क्र. १६३४६ तिरुवनंतपुरम-लोकमान्य टिळक टर्मिनस 'नेत्रावती एक्स्प्रेस' आणि गाडी क्र. १२६२० मंगळुरू सेंट्रल-लोकमान्य टिळक टर्मिनस 'मत्स्यगंधा एक्स्प्रेस' या गाड्या ठाणे स्थानकावर शॉर्ट टर्मिनेट केल्या जाणार आहेत. पायाभूत सुविधांची देखभाल आणि सुरक्षिततेसाठी हे ब्लॉक आवश्यक आहेत.

# मंगलम कंपनी व्यवस्थापनाने शासकीय मोजणीदारांना गेटवरूनच हाकलले

**खालापूर : प्रतिनिधी**




महड श्री वरद विनायक मंदिराचा जीर्णोद्धार केला जाणार आहे. यासाठी देवस्थान समितीने परिसरातील जागेचा सर्व्हे केला जात आहे. मात्र, या मोजणीला कापूर उत्पादक कंपनी मंगलम कुंभिवली व्यवस्थापनाने विरोध केल्याने कंपनी विरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे.

श्री. क्षेत्र महड देवस्थानची ५२ गुंठे जागा कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर असल्याचे निष्पन्न झाल्याने या जागेची शासकीय सर्व्हे करण्यासाठी अधिकारी व देवस्थानचे विश्वस्त, व्यवस्थापक कंपनीत गेले होते. व्यवस्थापनाने मोजणी अधिकारी, देवस्थान विश्वस्तांना कंपनीच्या आवारात प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आल्याने जमीन मोजणी अधिकाऱ्यांना सर्व्हे न करता परतावे लागले.

तालुक्यातील कुंभिवलीतील कापूर उत्पादक मंगलम् कंपनीत श्री. क्षेत्रमहड देवस्थानची मालकीची सर्व्हे नं २७/१ आणि २५/३ अशी ५२ गुंठे जागा कंपनीच्या मुख्य प्रवेश-द्वारासमोर असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर देवस्थानने शासकीय सर्व्हे करण्याची मागणी केली होती. खालापूर भूमी अभिलेखचे मोजणीदार पोलिस बंदोबस्तात मंगलम् कंपनीत प्रवेश करण्यासाठी. गेले होते. कंपनीच्या मुख्य प्रवेश- द्वारावर खालापूर भूमी अभिलेख अधिकारी दिपमाला राजपूत, देवस्थानचे विश्वस्त किरण काशिकर, व्यवस्थापक अतुल टट्टू, आणि कर्मचाऱ्यांना तब्बल ४ तास कंपनीच्या प्रवेशद्वारा समोरच रोखून धरल्याने मोजणीदार दिपमाला राजपूत यांनी प्रवेश नाकारला असल्याचा पंचनामा केला.

# चौक-कर्जत मार्गावर मध्यरात्री अपघात; दोन तरुणांचा मृत्यू

**चौक : प्रतिनिधी**

चौक-कर्जत रस्त्यावर बोरगावजवळ दोन मोटरसायकलस्वारांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१४) मध्यरात्री घडली. अपघात रात्री झाला असल्याने त्यांना वेळीच मदत मिळू शकली नाही.

यातील एक तरुण सिद्धार्थ जाधव (वय ३१, रा. नेरळ) हा चौक दिशेकडून कर्जतकडे जात होता, तर दुसरा युवक सुजित बोराडे (वय २६, रा. भिसेगाव, कर्जत) हा चौक दिशेला येत होता.

बोरगाव हद्दीत दोन्ही मोटरसायकल एकमेकांना धडकून अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन पवार आणि चौक प्रभारी विशाल पवार यांनी पथकासह घटनास्थळी जाऊन पुढील कार्यवाही केली. दोन्ही तरुणांचे मृतदेह चौक ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले आहेत.

दोन्ही तरुण घरातील एकुलते एक होते असे समजते. त्यामुळे दोन्ही कुटुंबावर मोठा आघात झाला असल्याचे उपस्थित असलेल्या मित्र परिवाराने सांगितले. अकाली मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे.

# नागोठणे विभागाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही -आमदार अनिकेत तटकरे

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री नामदार अदितीताई तटकरे यांच्या सहकार्याने नागोठणे विभागाच्या विकासासाठी यापूर्वीही निधीची कोणतीही कमतरता भासू दिली नाही आणि यापुढेही भासू देणार नाही. नागोठणे विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी तटकरे कुटुंबीय कायमस्वरूपी कटीबद्ध असल्याचा विश्वास आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी व्यक्त केला.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते तथा कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे आमदार अनिकेतभाई तटकरे हे बिनविरोध निवडून येत सलग दुसऱ्यांदा आमदार झाले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन करण्यासाठी नागोठणे विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा कार्यकर्त्यांनी शनिवार, दि. १३ जून रोजी रोहा तालुक्यातील सुतारवाडी येथे त्यांची भेट घेतली.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आमदार तटकरे यांनी नागोठणे विभागाच्या विकासाबाबत आपली ठाम भूमिका मांडली आणि विकासकामांना गती देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू राहतील, अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्यकर्ते मनोज टके, अखलाक पानसरे, ॲड. श्रीकांत रावकर, चेतन टके, ध्रुव सोष्टे, केतन भोय, पंकज टके, प्रणित शिर्के, मोरेश्वर सगणे, घनश्याम ताडकर यांच्यासह आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्यावर विशेष प्रेम करणारे पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील कार्यकर्ते भरत शिरसाट, संदीप जोशी, राजेंद्र आवटे, विशाल दरेकर, नितीन शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ऐनघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या नवीन घंटागाडीचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**



रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत ऐनघरच्या वतीने ग्रामपंचायत हद्दीतील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यासाठी नवीन घंटागाडी खरेदी करण्यात आली आहे. या घंटागाडीचे उद्घाटन शुक्रवार, दि. १२ जून रोजी ग्रुप ग्रामपंचायत ऐनघरच्या सरपंच कलावती राजेंद्र कोकळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रामसेवक गोविंद शिद, सदस्य प्रकाश डोबळे, सचिन भोसले, विठ्ठल इंदुलकर, यशवंत शिद तसेच संतोष कनघरे, प्रभाकर उमासरे, महादेव भोईर, तुकाराम शिरसे, राजेंद्र कोकळे, राम तेलंगे, ग्रामपंचायत कर्मचारी राजेंद्र जाधव आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी घंटागाडीचे महत्त्व विषद करताना सांगितले की, गावातील घरगुती कचऱ्याचे नियमित संकलन व योग्य व्यवस्थापन करण्यासाठी घंटागाडी ही अत्यंत उपयुक्त व्यवस्था आहे. यामुळे गावातील स्वच्छता राखण्यास मदत होणार असून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होईल. तसेच पर्यावरण संरक्षणास चालना मिळून ग्रामस्थांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होईल.

# मुरूड, खोरा बंदरात लाटांचा जोर वाढला

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरुड, खोरा बंदरातील समुद्र किनाऱ्यांवर लाटांचा जोर वाढला असुन जोराचे वारे वाहत आहेत.किनाऱ्यावर लाटांचा मारा होत आहे. मात्र उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांवर कालपासून समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या आहेत. किनारी भागात वाऱ्याचा वेगही वाढलेला पाहायला मिळाला. दरम्यान, लाटांचा जोर वाढल्याने किनारपट्टीवरील नागरिकांना तसेच पर्यटकांना सतर्कतेचा प्रशासनामार्फत इशारा दिला आहे.पाऊस न पडताच लाटा असल्याने किनारी राहणारे कोळी बांधव व शेतकरी चिंतेत आहेत ,जंजिरा व पदामदुर्ग किल्ल्याच्या भिंती १०० फूट उंच असून त्याच्या वरून लाटा उडत असल्याने आचार्य होत आहे नक्कीच समुद्राच्या पोटात काहीतरी सुरु आहे

मुरुड समुद्र किनारी सध्या मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. लाटांचा प्रभाव वाढल्याने पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणी राहून पर्यटनाचा आनंद घेण्याच्या सूचना दिल्यात. कालपासून समुद्राला उधाण आले. पुढील तीन दिवस किनारपट्टी भागात वादळी वारे व वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. पर्यटकांनी व स्थानिक नागरिकांनी समुद्रात पोहण्यास जावु नये तसेच कोळीबांधवानी मच्छीमारीकरिता समुद्रात जावू नये असा सतर्कतेचा इशारा प्रशासक तथा मुख्याधिकारी बच्छाव यांनी दिला आहे.

# अमेरिकेचा ऐतिहासिक विजय

## सलामीला यजमानांतर्फे सर्वांत वेगवान गोल

**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेतील आपल्या सलामीच्या लढतीत यजमान अमेरिकेने येथील सोफी स्टेडियमवर पॅराग्वेचा ४–१ असा धुव्वा उडवला. या सामन्यातील पूर्वार्धात सातव्या मिनिटाला यजमानांतर्फे सर्वात वेगवान गोलाचा नवा विक्रम प्रस्थापित झाला. पॅराग्वेच्या डॅमियनकडून यावेळी स्वयंगोल झाला. यासह विश्वचषकाच्या इतिहासात सलामीच्या सामन्यात सर्वात वेगवान गोल करणाऱ्या यजमान देशांच्या यादीत अमेरिकेने तिसरे स्थान पटकावले आहे.



स्टेडियममध्ये उपस्थित ७०,४९२ चाहत्यांच्या साक्षीने रंगलेल्या या सामन्यात अमेरिकेने सुरुवातीपासूनच पॅराग्वेच्या बचाव फळीवर प्रचंड दडपण आणले. सातव्या मिनिटाला वेस्टन मॅकेनीने पॅराग्वेच्या डी–बॉक्समध्ये एक अत्यंत वेगवान आणि भेदक पास टाकला. हा हल्ला परतवून लावताना पॅराग्वेचा डिफेंडर डॅमियन बोबाडिला पुरता गडबडला. अमेरिकेच्या आक्रमक दबावापुढे बोबाडिलाच्या पायाला लागून चेंडू थेट त्याच्याच गोलपोस्टमध्ये गेला. हा 'स्वयंगोल' ठरला असला, तरी याने संपूर्ण स्टेडियममध्ये एकच जल्लोष निर्माण केला आणि अमेरिकेला १–० अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली.

या सातव्या मिनिटाला झालेल्या गोलने अमेरिकेला विश्वचषकाच्या इतिहासात मानाचे स्थान मिळवून दिले. सलामीच्या सामन्यात यापेक्षा वेगवान गोल केवळ दोनच यजमान देशांना करता आले आहेत.

### ऑस्ट्रेलियाची तुर्कीवर मात

**व्हँकुव्हर** : येथील बीसी प्लेसमध्ये झालेल्या 'गट डी'मधील सामन्यात ऑस्ट्रेलियाने तुर्कीवर २–० असा विजय मिळवला. पहिल्या हाफमध्ये नेस्टोरी इरानकुंडाने ऑस्ट्रेलियाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये ७५व्या मिनिटाला कॉनर मेटकाफने गोल करत ऑस्ट्रेलियाला विजयी आघाडी मिळवून दिली.

### स्कॉटलंडचे दमदार पुनरागमन

**फॉक्सबरो** : स्कॉटलंडने 'गट सी' मधील सामन्यात हैतीचा १–० असा पराभव करून विजयासह आपल्या मोहिमेची सुरुवात केली. ३२ वर्षांनंतर स्कॉटलंडने विश्वचषकात शानदार पुनरागमन केले. १९९८नंतर स्कॉटलंड पहिल्यांदाच या स्पर्धेत सहभागी होत आहे. १९९०मध्ये स्वीडनचा २–१ असा पराभव केल्यानंतरचा या संघाचा हा विश्वचषकातील पहिलाच विजय ठरला. सध्या ते 'गट सी' मध्ये अव्वल स्थानावर आहेत. स्कॉटलंडसाठी २८व्या मिनिटाला जॉन मॅकगिनने केलेला गोल निर्णायक ठरला. पहिल्या सत्रानंतर दुसऱ्या सत्रात दोन्ही संघांनी गोल करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले, परंतु त्यांना यश आले नाही.

# अफगाणिस्तानविरुद्ध वनडेत भारताची विजयी सलामी



**धर्मशाला : वृत्तसंस्था**

धर्मशालाच्या मैदानात रंगलेल्या भारत–अफगाणिस्तान यांच्यातील पहिल्या वनडे सामन्यात पावसाच्या बॅटिंगमुळे प्रत्येकी २५–२५ षटकांचा सामना खेळवण्याची वेळ आली. अफगाणिस्तानच्या संघाने गुरबाझच्या विक्रमी शतकी खेळीच्या जोरावर २५ षटकांत १९४ धावा करत टीम इंडियासमोर १९५ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना कर्णधार शुबमन गिल आणि लोकेश राहुलने दमदार फलंदाजी करत संघाला सात विकेट्स राखून विजय मिळवून दिला.

नाणेफेक जिंकून गिलने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानचा सलामीवीर रहमानुल्ला गुरबाझ याने ४८ चेंडूत अफगाणिस्तानकडून वनडेतील सर्वात जलद शतक साजरे केले. ५१ चेंडूत त्याने केलेल्या १०२ धावांची खेळी वगळता पाहुण्या संघातील अन्य फलंदाजांना खास छाप सोडता आली नाही. टीम इंडियाकडून पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या गुरनूर ब्रार आणि हर्ष दुबे यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय अर्शदीप सिंग आणि नितीश कुमारने प्रत्येकी दोन विकेट्स घेत अफघाणिस्तानच्या संघाला २४.५ षटकांत १९४ धावांवर रोखले.


अफगाणिस्तानच्या संघाने दिलेल्या १९५ धावांचा पाठलाग करताना गिल आणि रोहित शर्मा या जोडीने टीम इंडियाच्या डावाची सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा पल्ला गाठल्यावर रोहित १६ धावांवर बाद झाला. गिलसोबत ताळमेळाच्या अभावामुळे त्याने धावबादच्या रूपात आपली विकेट गमावली. त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या ईशान किशन याने २२ चेंडूत ३४ धावांचे योगदान दिले. श्रेयस अय्यर १५ चेंडूत १२ धावा करून परतल्यावर लोकेश राहुलने केलेल्या १९ चेंडूतील ३९ धावांची नाबाद खेळी केली. यासह गिलने ६६ चेंडूत केलेल्या ८४ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर भारतीय संघाने २३ व्या षटकातच सामना जिंकत वनडे मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे.

# टी-२० मुंबई लीगमध्ये मराठा रॉयल्स संघ सलग दुसऱ्यांदा जेता; फायनलमध्ये राडा

**मुंबई : प्रतिनिधी**

टी–२० मुंबई लीग स्पर्धेतील अंतिम सामना आर्क्स अंधेरी आणि मराठा रॉयल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अंतिम सामना जसा हवा, तसाच हा सामना रंगला. शेवटच्या षटकापर्यंत दोन्ही संघांना विजय मिळवण्याची सुवर्णसंधी होती. अखेर मराठा रॉयल्सकडून रोहन राजेने निर्णायक षटक टाकले आणि मराठा रॉयल्स संघाला सलग दुसऱ्यांचा जेतेपदाची ट्रॉफी जिंकून दिली, पण या सामन्यादरम्यान नाट्यमय घटना घडल्या.

अंतिम सामन्यात अंधेरीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. चिन्मय राजेश सुतारच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर मराठा रॉयल्सने २० षटकांत पाच बाद १५४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात अंधेरी संघ धावांचा पाठलाग करत असताना मराठा रॉयल्स संघाकडून १९वे षटक टाकण्यासाठी इरफान उमेर गोलंदाजीला आला. त्यावेळी



गौरव जठर स्ट्राईकवर होता. या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर गौरव जठरने खणखणीत षटकार खेचला. त्यामुळे मराठा रॉयल्स संघावरील दबाव वाढला, पण पुढच्याच चेंडूवर सामना मराठा रॉयल्स संघाच्या बाजूने फिरला, कारण इरफान उमेरने त्याला पायचीत करत माघारी धाडले. त्यामुळे गौरवचा डाव १७ चेंडूत २३ धावांवर आटोपला.

गौरव बाद झाल्यानंतर मराठा रॉयल्स संघातील खेळाडूंनी जल्लोष केला. त्यावेळी गौरव आणि मराठा रॉयल्स संघाचा अनुभवी गोलंदाज तुषार देशपांडे यांच्यात बाचाबाची झाली. दोघेही एकमेकांच्या अंगावर धावून आले. मोईन खान आणि इतर खेळाडूंनी मध्यस्थी करत हा वाद मिळवला, पण त्यामुळे काही वेळ सामना थांबवावा लागला.

हा वाद इतक्यात थांबला नाही, त्यानंतर मराठा रॉयल्स संघातील खेळाडू आर्क्स अंधेरीच्या डगआऊटच्या दिशेने धावत गेला. त्यावेळी दोन्ही संघातील खेळाडूंमध्ये धराधरी झाली. त्यावेळी खेळाडूंना आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्यांना मध्यस्थी करावी लागली. शेवटचे षटक टाकण्यासाठी रोहन राजे गोलंदाजीला आला. या षटकात आर्क्स अंधेरी संघाला विजयासाठी १४ धावांची गरज होती, पण रोहनने आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा घेत अचूक टप्प्यावर गोलंदाजी केली. सरतेशेवटी अंधेरी संघाला २० षटकांत ८ बाद १४६ धावाच करता आल्या. परिणामी मराठा रॉयल्सने आठ धावांनी रोमांचक विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

# मोरोक्कोविरुद्ध ब्राझीलची बरोबरी

## नेमारच्या अनुपस्थितीत विनी ज्युनियरने तारले

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत पाच वेळचा वर्ल्ड चॅम्पियन ब्राझील आणि 'जाएंट किलर'च्या रूपात छाप सोडणारा मोरोक्को यांच्यात अपेक्षेप्रमाणे रंगतदार सामना पहायला मिळाला. गत हंगामात रोनाल्डोच्या पोर्तुगालसह स्पेनला दणका देत उपांत्य फेरी गाठणाऱ्या मोरोक्कोच्या संघाने नेमारशिवाय खेळणाऱ्या ब्राझीलविरुद्धच्या सामन्यात आक्रमक खेळाचा खास नजराणा पेश केला, पण ब्राझीलसाठी विनी ज्युनियर धावून आला आणि सामना १–१ बरोबरीत सुटला.

मिडफिल्डर इस्माईल सैबारी याने २१व्या मिनिटाला अप्रतिम गोलसह मोरोक्को संघाला १–० अशी आघाडी मिळवून दिली. ब्राझीलसारख्या बलाढ्य संघाला बॅकफूटवर ढकलत त्यांनी सलग दुसऱ्या हंगामात सर्वोत्तम कामगिरी करून दाखवण्याची क्षमता असल्याची झलक दाखवून दिली.



ब्राझीलचा संघ हा फिफा विश्वचषकाच्या प्रत्येक हंगामात खेळणारा आणि सर्वाधिक वेळा जेतेपद पटकवणारा संघ आहे. त्यामुळो मोरोक्कोची आघाडी ही त्यांच्यासाठी एक धक्काच होती. संघ पिछाडीवर असताना विनी ज्युनियर संघाच्या मदतीला धावला. त्याने ३२व्या मिनिटाला वेग, चेंडूवरील उत्कृष्ट नियंत्रण आणि जबरदस्त कौशल्य दाखवत मोरोक्कोची बचावफळी भेदली. गोलकीपरला काही कळण्याआधीच गोळीच्या वेगाने गोल डागत त्याने ब्राझीलला १–१ बरोबरीत आणले.


निर्धारित ९० मिनिटांच्या खेळानंतर स्कोअर बरोबरीत असताना रेफरींनी १० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला, मात्र यातही कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. पिछाडीवरून बरोबरी साधत ब्राझीलच्या संघाने १९३४च्या हंगामापासून सलामीच्या सामन्यातील अपराजित राहण्याचा आपला विक्रम आणखी भक्कम केला.

# कतारने स्वित्झर्लंडला बरोबरीत रोखले : बुआलेम खोखीचा शानदार 'हेडर'

**सांता क्लारा : वृत्तसंस्था**

सांता क्लाराच्या सॅन फ्रान्सिस्को बे एरिया स्टेडियमवर रविवारी मध्यरात्री रंगलेल्या स्वित्झर्लंडविरुद्धच्या सामन्यात कतारच्या संघाने विश्वचषकातील अखेरच्या क्षणी गोल डागत नवा इतिहास रचला आहे. त्यांच्या विजयाचा

'ब' गटातील सामन्यात स्वित्झर्लंडचा संघ हा विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात होता. १७व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टीवर ब्रील एमबोलोच्या गोलच्या रूपात स्वित्झर्लंडच्या संघाने सामन्यावर मजबूत पकडही मिळवली. एवढेच नाही तर ९० मिनिटे त्यांनी आघाडी कायम



ठेवली, पण अतिरिक्त सहा मिनिटांच्या वेळेत कतारने मोठा उलटफेर दाखवणाऱ्या निकालाची नोंद केली. ९५व्या मिनिटाला कतारचा अनुभवी खेळाडू बुआलेम खोखी याने अप्रतिम 'हेडर'सह स्वित्झर्लंडसाठी डोकेदुखी वाढवणारा गोल डागत सामना १–१ बरोबरीत संपण्याची कमाल केली. यासह कतारनं विश्वचषक स्पर्धेत पहिला गुण मिळवला.

आशिया खंडातील कतारचा संघ पहिल्यांदाच स्वबळावर फुटबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. याआधी २०२२च्या हंगामात यजमान असल्यामुळे त्यांना थेट एन्ट्री मिळाली होती, पण घरच्या मैदानात त्यांना तिन्ही सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला होता. मोहम्मद मुनतारी याने सेनेगल विरुद्ध गोल डागला होता, पण या सामन्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. अखेर यंदाच्या हंगामात बुआलेम खोखीच्या गोलच्या जोरावर त्यांनी स्वित्झर्लंडच्या संघाला १–१ बरोबरीत रोखत पहिला गुण आपल्या खात्यात जमा केला आहे. आशियाई फुटबॉल चॅम्पियनसाठी हा निकाल सामना जिंकल्याच्या आनंद देणाराच आहे.

स्वित्झर्लंडचा संघ १३व्या वेळी वर्ल्डकप स्पर्धेत उतरला आहे. २००६पासून ते सलग सहा वेळा वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरले. गत हंगामात त्यांनी उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. त्यामुळेच कतारविरुद्धचा पेपर त्यांच्यासाठी अगदी सोपा होता, पण कतारने मोठा उलटफेर करत त्यांची डोकेदुखी वाढवली आहे. स्वित्झर्लंड आणि कतार यांच्यातील लढतीआधी 'ब' गटात कॅनडा आणि बोस्निया आणि हर्जेगोविना यांच्यातील सामनाही बरोबरीत सुटला होता.

# रोहित शर्माचा १६००० धावांसह मोठा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

धर्मशालाच्या मैदानात भारताचा माजी कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्माने विक्रमावर विक्रम प्रस्थापित केले. क्षेत्ररक्षणावेळी मैदानात उतरत सर्वात अधिक वयात वनडे खेळण्याचा विक्रम प्रस्थापित केल्यावर फलंदाजीवेळी हिटमॅन रोहित शर्माने आणखी एका महारेकॉर्डला गवसणी घातली.

अझमतुल्लाह ओमरझाई घेऊन आलेल्या तिसऱ्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर रोहित शर्माने पुल शॉटसह षटकार खेचत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा पल्ला गाठला. सलामीवीराच्या रूपात आंतरराष्ट्रीय क्रिकेमध्ये सर्वात जलदगतीने हा पल्ला गाठण्याचा महारेकॉर्ड रोहितने आपल्या नावे केला आहे.

रोहित शर्मा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा पल्ला गाठणारा सेहवागनंतर दुसरा भारतीय सलामीवीर ठरला, पण फक्त ३८४ डावात त्याने हा आकडा गाठत सेहवाग–सचिनलाच नव्हे; तर डेविड वॉर्नरलाही मागे टाकत विश्वविक्रम आपल्या नावे केला. सेहवागने ३९३ डावात १६ हजार धावांचा पल्ला गाठला होता. डेविड वॉर्नेनर ३९० डावात ही कामगिरी केली होती.

# कर्जतचा अथर्व देशमुख फिलिपिन्स येथील स्पर्धेत चॅम्पियन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाली गावचे रहिवासी नवज्योत देशमुख यांच्या लहानग्या मुलाने कमाल केली आहे. त्यांचा अथर्व फिलिपिन्स येथील स्पर्धेत चॅम्पियन ठरला आहे.

लहानगा भारतीय ट्रायथलिट अथर्व देशमुख हा आर्यन किड्स फिलिपिन्स सुबिक बॉय स्पर्धेत उतरला होता. नऊ वर्षांच्या अथर्वने सतत पडणारा पाऊस, समुद्राचे खळाळते लाटांचे पाणी आणि हवामानाचे मोठे आव्हान असतानादेखील एका खऱ्या चॅम्पियनसारखी अवघ्या २९ मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली आणि स्पर्धेतील चॅम्पियन ठरला. अशा कठीण परिस्थितीत अथर्व ने भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**अथर्वची नेत्रदीपक कामगिरी**

१५० मीटर – समुद्रातील पोहणे

४ किलोमीटर – सायकलिंग

१.५ किलोमीटर – धावणे






# भारतीय तिरंदाजांनी साधला 'सुवर्ण'वेध!

**अंताल्या : वृत्तसंस्था**

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेतून भारतासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. भारताचा धीरज बोम्मदेवरा आणि कुमकुम मोहोड या जोडीने तिरंदाजी विश्वचषक २०२६च्या तिसऱ्या फेरीत ऑलिम्पिक विजेत्यांना हरवत सुवर्णपदक पटकावले आहे. तुर्कीतील अंताल्या येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने विद्यमान ऑलिम्पिक विजेता दक्षिण कोरियाचा ५–१ असा पराभव करत जेतेपदक पटकावले आहे.

अंतिम सामन्यात भारतासमोर दक्षिण कोरियाची बलाढ्य जोडी ओह ये–जिन आणि किम जे–डिओक यांचे आव्हान होते, पण धीरज आणि कुमकुम यांनी सुरुवातीपासूनच अचूक लक्ष्यभेद करत सामन्यावर नियंत्रण ठेवले. भारताने पहिल्या दोन सेटमध्ये अनुक्रमे ३७–३६ आणि ३७–३६ अशी एक–एक गुणांच्या फरकाने बाजी मारली. त्यामुळे भारताने ४–० अशी आघाडी घेतली.




तिसरा सेट ३९–३९ असा बरोबरीत सुटल्याने कोरियाला एक गुण मिळाला, मात्र भारताने ५–१ने सामना जिंकत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

निर्णायक क्षणी धीरज बोम्मदेवराने जबरदस्त अचूकता दाखवत शेवटचे दोन बाण थेट परफेक्ट १० मध्ये मारले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारताचा विजय निश्चित झाला. ऑलिम्पियन धीरजसाठी (२४) आणि कुमकुम मोहोडसाठी (१७) हे त्यांच्या कारकिर्दीतील पहिलेच वर्ल्ड कप मिश्र सांघिक सुवर्णपदक ठरले.

याआधी भारताने २०२२ मध्येही अंताल्या येथेच रिकर्व्ह मिश्र सांघिक प्रकारात वर्ल्ड कप सुवर्णपदक जिंकले होते. त्यावेळी ऋद्धी फोर आणि तरुणदीप राय यांनी ग्रेट ब्रिटनचा शूट–ऑफमध्ये पराभव करत भारताला जेतेपद मिळवून दिले होते. आता धीरज आणि कुमकुम यांच्या या ऐतिहासिक विजयामुळे आगामी आशियाई क्रीडा स्पर्धांपूर्वी भारतीय तिरंदाजी संघाचा आत्मविश्वास आणखी उंचावला आहे.

# आरडीसीएतर्फे क्रिकेट पंच प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने १४ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत रायगड जिल्ह्यातील सर्व क्रिकेट पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण शिबिर ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून घेण्यात येणार असून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) पंच परीक्षेसाठीच्या पूर्वतयारीकरिता हे प्रशिक्षण शिबिर उपयुक्त ठरणार आहे.

पंच प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून माजी रणजीपटू व बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, रूपेश खडगी, एमसीएचे पंच राजन कसबे व एमसीसी लॉ तज्ज्ञ नयन कट्टा काम पाहणार आहेत. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रिकेट पंचांनी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. शिबिरामध्ये सहभाग घेण्यासाठी प्रशांत माळी (९८३३०३८९९१) यांच्याशी संपर्क साधावा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com